# अहमदाबादमध्ये विमान कोसळून २४१ जणांचा मृत्यू




रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२६
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, १३ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

**■ पंतप्रधान मोदी हळहळले...**
अहमदाबादमध्ये झालेला विमान अपघात ही मोठी दुर्घटना आहे. अहमदाबाद येथील दुर्घटनेने मला धक्का दिलाय आणि दु:खी केलंय. हे दु:ख शब्दांत सांगता येणार नाही. या दु:खद घटनेत प्रभावित झालेल्यांना मदत करण्यासाठी काम करणाऱ्या मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

# प्रवासी विमानाचा टेक ऑफनंतर अवघ्या काही सेकंदातच अपघात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**
**गुजरातमधील अहमदाबाद येथून लंडनला जाणाऱ्या विमानाचा टेक ऑफनंतर अवघ्या पाच मिनिटांत अपघात झाला. या अपघातात २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. गुरुवारी (दि.१२) दुपारच्या सुमारास हा अपघात झाला. दरम्यान, हे विमान ज्या मेडिकल वसतिगृहावर कोसळले तेथील काही विद्यार्थ्यांचाही मृत्यू झाला आहे.**



अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानात एकूण २४१ प्रवासी होते, अशी माहिती डीजीसीएच्या निवेदनात देण्यात आली आहे. त्याशिवाय, या विमानात दोन वैमानिक व १० केबिन क्रू मेंबर्स होते, असेही या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. कॅप्टन सुमीर सभरवाल हे या विमानाचे वैमानिक होते. त्यांना आठ हजार २०० तासांच्या उड्डाणांचा अनुभव आहे. त्याशिवाय केबिन क्रूलादेखील ११०० तासांच्या उड्डाणांचा अनुभव आहे, असे एअर इंडियाने निवेदनात म्हटले आहे.

या अपघातग्रस्त विमानामध्ये प्रवास करणाऱ्या प्रवासांची नावे पुढे आली आहेत. फक्त भारतीय नागरिकच नाही तर विदेशी नागरिकदेखील मोठ्या संख्येने या विमानात होती. एअर इंडियाने या घटनेबाबत निवेदन जारी केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, विमानात १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश नागरिक, एक कॅनेडियन नागरिक आणि सात पोर्तुगाली नागरिक होते. या घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. पोलीस आणि प्रशासकीय टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

'डीजीसीए'च्या माहितीनुसार, लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाइट एआय १७१ या विमानाचे कॅप्टन सुमित सभरवाल होते. त्यांच्यासोबत सहवैमानिक क्लाइव्ह कुंदर हे को-पायलट होते. कॅप्टन सभरवाल यांचा विमान उड्डाणाचा ८२०० तासांचा अनुभव होता. तर सहवैमानिक कुंदर यांचा ११०० तासांचा अनुभव होता. विमानाने टेकऑफनंतर लगेचच एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी)ला 'मेडे' कॉल दिला, मात्र त्यानंतर एटीसीच्या कोणत्याही कॉलला प्रतिसाद दिला गेला नाही, अशी माहिती 'डीजीसीए'ने एएसआयच्या माध्यमातून दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.

### महाराष्ट्रातील प्रवाशांचा समावेश

या अपघातात महाराष्ट्रातीलदेखील काही जण मृत्युमुखी पडले आहेत. या वेळी एअर इंडियाच्या १२ क्रू मेंबर्सपैकी तीन जण, तर सहा जण प्रवासी हे महाराष्ट्रातील होते. अपर्णा महाडिक, मैथिली पाटील आणि रोशनी राजेंद्र सोनघरे या तीन महिला क्रू मेंबर्स तसेच विमानातील कर्मचारी होत्या, तर महादेव पवार, आशा पवार, मयुर पाटील, यशा कामदार, रुद्र कामदार आणि रक्षा मोढा हे सहा जण प्रवासी होते.

### 'टाटा'कडून प्रत्येकाला एक कोटी


टाटा समूहाने अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. याशिवाय, जखमींच्या वैद्यकीय खर्चाचा पूर्ण भार टाटा समूह उचलणार असून, त्यांना सर्व आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि पुनर्वसनाची हमी दिली आहे.

### माजी मुख्यमंत्री रुपाणीही मृत्युमुखी



वृत्तसंस्था एएनआयनुसार, गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे देखील या विमानात होते. अहमदाबादच्या पोलीस आयुक्तांनी विजय रुपाणी यांच्या निधनाची माहिती दिली आहे. विजय रुपाणी यांचा प्रवास म्यानमारमधील यांगून ते गुजरातचे मुख्यमंत्री होण्यापर्यंत कसा होता. आरएसएस स्वयंसेवक ते भाजपचे ज्येष्ठ नेते अशी त्यांची कहाणी कठोर परिश्रम आणि साधेपणाचे उदाहरण आहे.

### खासदार तटकरेंच्या भाचेसुनेचा मृत्यू



या विमानामध्ये एकूण १२ क्रू मेंबर्स होते यापैकी एक अपर्णा महाडिक या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचा सख्या भाचा अमोल यांची पत्नी आहे. तसेच क्लाईव्ह कुंदर-फर्स्ट ऑफिसर, सुमित सबरवाल, श्रद्धा धवन-केबिन एक्झिक्युटिव्ह १, दीपक पाठक-केबिन एक्झिक्यूटिव्ह २, इरफान शेख, नंथेम सिंगसेन, मैथिली पाटील आणि मनीषा थापा अशी इतर क्रू मेंबर्सची नावे आहेत.

### पनवेल तालुक्यातील न्हावे गावाच्या मैथिली पाटीलचाही मृत्यू



दुर्घटनाग्रस्त विमानात एअर होस्टेस म्हणून काम करीत असलेल्या मैथिली पाटील (वय २३) यांचाही मृत्यू झाला आहे. त्या पनवेल तालुक्यातील न्हावे गावाचे भाजपचे बुथ अध्यक्ष मोरेश्वर पाटील यांच्या कन्या आहेत.

**■ विमानातील एक जण बचावला**
या अपघातामध्ये एक व्यक्ती वाचल्याचे वृत्त आहे. रमेश विश्वास कुमार असे या वाचलेल्या प्रवाशाचे नाव असून तो ४० वर्षांचा आहे. अहमदाबादमधील असरवा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांना सीट ११ए मध्ये एक जिवंत प्रवासी सापडला.

**अहमदाबाद येथून लंडन येथे जाणाऱ्या एअर इंडियाच्या प्रवासी विमानाचा आज अहमदाबाद येथे दुर्दैवी अपघात झाला. या विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत यातील जखमी नागरिकांवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी ईश्वराकडे प्रार्थना...!**
**-आमदार प्रशांत ठाकूर**

## निवडक

### दिल्लीजवळ रेल्वेचा डब्बा रुळावरून घसरला



**दिल्ली :** दिल्लीत ट्रेन रुळावरून घसरली. हजरत निजामुद्दीहून गाजियाबादला जाणारी ट्रेनचा चौथा डब्बा रुळावरून खाली घसरल्यामुळे ही दुर्घटना घडली. शिवाजी ब्रिज स्टेशनच्या जवळ हा अपघात झाला. रेल्वेने सांगितले की, सायंकाळी ४:१० वाजता डाउन मेन लाइनवर शिवाजी ब्रिजजवळ ट्रेन क्रमांक ६४४१९चा एक डबा रुळावरून घसरला. दुरुस्तीचे काम सुरू आहे. या दुर्घटनेत कोणीही जखमी अथवा मृत झालेले नाही.

### कोकणात अतिमुसळधार पावसाचा अलर्ट

**पुणे :** राज्यातील मुंबईसह आसपासच्या भागात अनेक दिवस रखडलेला पाऊस आता मात्र सक्रीय झाला असून, येत्या ४८ तासात विदर्भ व्यापणार आहे. दरम्यान पुढील काही दिवस कोकणात अतिमुसळधार (रेड अलर्ट), मध्यमहाराष्ट्रात (ऑरेंज अलर्ट) मुसळधार, मराठवाडा आणि विदर्भात (यलो अलर्ट ) वादळीवारे, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटात पाऊस पडणार आहे. विशेषत: कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग या भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

## काँग्रेस का हात पाकिस्तान के साथ -चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई : प्रतिनिधी**
जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. २६ निष्पाप हिंदू पुरुषांची हत्या करण्यात आली. याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर केले आणि पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यावरून संपूर्ण जग भारताचे कौतुक करत आहे. पण याचदरम्यान, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मात्र एक असंवेदनशील विधान केले आहे. ऑपरेशन सिंदूर म्हणजे लहान मुलांचा व्हिडीओ गेम असा पटोले यांनी उल्लेख केला. त्यांच्या या विधानावर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार केला.

ऑपरेशन सिंदूर म्हणजे कॉम्प्युटर गेम आहे' असं संतापजनक वक्तव्य काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केलं आणि 'काँग्रेस का हात पाकिस्तान के साथ' हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. भारताच्या शत्रूंच्या मनात भीती निर्माण करणाऱ्या या मोहिमेची हेटाळणी करणं म्हणजे फक्त वीर जवानांचा आणि त्यांच्या शौर्यांचा अपमान नाहीतर संपूर्ण भारतीयांचा अपमान आहे. नाना पटोले यांच्या या बाष्कळ विधानामुळे शहीद जवानांच्या कुटुंबियांना किती वेदना होणार आहेत, याची कल्पना या संवेदनाहीन माणसाला आहे की नाही? असा खरमरीत सवाल बावनकुळेंनी केला.

नाना, ऑपरेशन सिंदूर म्हणजे कॉम्प्युटर गेम नाही तर पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या अड्ड्यावर केलेली धाडसी आणि शौर्याची कारवाई आहे. ही देशद्रोह्यांच्या छातीत धडकी भरवणारी जाज्वल्य शौर्यगाथा आहे! नाना, तुमच्या या देशद्रोही मानसिकतेला देश कधीच माफ करणार नाही. तुमचा मन आणि मेंदू भ्रष्ट झाला आहे. मी तुमच्या नीच मानसिकतेचा कडाडून निषेध करीत आहे, असे ट्विट त्यांनी केले.

## पंतप्रधान मोदी सरकारच्या ११ वर्षांत भारताचा ऐतिहासिक कायापालट

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**
लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात भारताच्या विकासाला एक नवा आयाम दिला आहे. त्यामुळे देशाने 'विकसित भारत', 'आत्मनिर्भर भारत' आणि 'संकल्प से सिद्धी' या मंत्रांचा अंगीकार करत ऐतिहासिक परिवर्तनाचा काळ अनुभवला आहे. हा कार्यकाळ भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १२) येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ११ वर्षे पूर्ण केल्याबद्दल आणि त्या अनुषंगाने सरकारने देशवासियांसाठी केलेले योजना, निर्णय, उपक्रमांची माहिती देण्यासाठी पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेला संबोधित करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या वेळी आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, **(पान २ वर..)**

**■ नाना पटोलेंच्या व्यक्तव्याचा निषेध**
काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ऑपरेशन सिंदूरवर केलेल्या बेताल व्यक्तवावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी नाना पटोले यांच्या व्यक्तवाचा निषेध व्यक्त केला. ऑपरेशन सिंदूर हि देशाच्या सैन्यांची विजयीगाथा असताना ऑपरेशन सिंदूर एक लहान मुलांचा कंप्युटर व्हिडिओ गेम असे व्यक्त करणे म्हणजे देशातील जवानांचा अपमान आहे, देशाच्या सैन्याचा अपमान जनता कधीच सहन करणार नाही, त्यामुळे जनतेनेही पटोलेंचा धिक्कार केला पाहिजे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची आंतरराष्ट्रीय मकाबिया २०२५ गेम्ससाठी निवड

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी कुमार बेंजामिन अमिएल याची मकाबिया गेम्स या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. या बद्दल संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर यांनी बेंजामिनचे अभिनंदन व कौतुक करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी राहुल घरत तसेच मान्यवर उपस्थित होते.

या यशासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे, मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. रीत ठुले, प्रा. रेवान शिंदे, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. शितल चव्हाण व प्रा. स्नेहा नाईक या सर्वांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन मिळाले तो आता जागतिक मंचावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणार असून त्याला ही स्पर्धा इस्रायल येथे होणार आहे.

बेंजामिनला संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

## सांगलीतील 'त्या' हत्येचे गूढ उकलले

**सांगली :** जिल्ह्यामधील सांगलीच्या कुपवाड मधील प्रकाशनगर मध्ये एकता कॉलनीत रात्री पती झोपल्यावर अनिल लोखंडे याची पत्नीने हत्या केली होती. दोघांनीही २३ मे २०२५ ला लग्न केले होचे. लग्नानंतर १७ व्या दिवशी पत्नी राधिका हिने डोक्यात कुऱ्हाड घालून त्याची हत्या केली, मात्र हत्येमागे एक भीती होती, ज्यामुळे आरोपी पत्नी राधिकाने आपल्याच कुंकवाला संपवले.

अनिल लोखंडे हा गवंडी म्हणून काम करत होता. त्याचे आधी लग्न झाले होते, त्याला दोन्ही मुली होत्या. त्यांची लग्न झाली असून त्याच्या पहिल्या पत्नीचे कर्करोगामुळे निधन झाले होते. त्यामुळे जेवणाचे हाल होत असल्याने अनिलने राधिकासोबत लग्न करण्याचा निर्णय घेतला होताय. राधिकाला जन्मापासूनच गर्भपिशवी नव्हती, ही गोष्ट अनिललाही माहिती होती.

१० जूनला वटपोर्णिमेला राधिकाल अनिल याने तिच्या मावस भावाच्या घरी सोडले होते. **(पान २ वर..)**

## राज्यातील सिंचन व जलविद्युत प्रकल्पांची कामे पूर्ण करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**
राज्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्यातील ३८१ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून ३० लाख ६८ हजार ६७३ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर ४५ उदंचन प्रकल्पांच्या माध्यमातून ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती, तर ९६ हजार १९० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याचे विकासचक्र वेगवान करण्यासाठी सिंचन प्रकल्प आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबध्दरित्या गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांना दिलेल्या प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता यांच्या प्रगतीचा आढावा, तसेच पंपस्टोरेज धोरणासंदर्भात सामंजस्य करारांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. या वेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि गिरीश महाजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील सिंचन प्रकल्प कृषी अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहेत. **(पान २ वर..)**

# आषाढी यात्रेसाठी परिवहन महामंडळ ५ हजार २०० विशेष बसेस सोडणार-परिवहन मंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

आषाढी यात्रेनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी राज्य परिवहन महामंडळाने यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते आषाढी एकादशीच्या नियोजनासाठी पंढरपूर येथे बोलावलेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते.



मंत्री सरनाईक म्हणाले, विशेष म्हणजे यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सालाबाद प्रमाणे श्री श्रेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी येतात. अनेक प्रवाशी स्वतःच्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सूट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकिट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे विनातिकीट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा विनातिकीट प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत.

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत .

यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

## पहिल्याच दिवशी नवी मुंबईत मुलांना पाठ्यपुस्तके

**नवी मुंबई : शहर प्रतिनिधी :**

महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमधील पहिली ते आठवीचे वर्ग १६ जूनपासून सुरू होत असून शाळेच्या पहिल्या दिवशीच मुलांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जाणार आहेत. याबाबतची सर्व तयारी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षण विभागाने केलेली असून इयत्ता पहिली ते आठवीच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या तसेच खाजगी अनुदानित अशा एकूण १५२ शाळांमध्ये शिकत असलेल्या ६१ हजार ८७९ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवण्यात येणार आहेत.

इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिकणारे कोणतेही बालक पुस्तकापासून वंचित राहू नये आणि त्याला पाठ्यपुस्तकाअभावी शिक्षणात अडचण येऊ नये तसेच शाळेत दाखल सर्व मुलांची १००% उपस्थिती टिकविणे त्याचप्रमाणे गळतीचे प्रमाण शून्यावर आणणे यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका ते शाळा स्तरापर्यंतची पाठ्यपुस्तके महानगरपालिकेकडून ४ जून ते १० जून या कालावधीत शाळेच्या मुख्याध्यापकांना वितरीत करण्यात आलेली आहेत.ही पाठ्यपुस्तके संबंधित शाळेचे मुख्याध्यापक विभागातील पदाधिकारी, अधिकारी, पालक यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी वितरित करतील.



## अलिबाग शहरात ११ हजारांचा गुटखा जप्त

### दोघे अटकेत

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरात अवैध गुटखा विक्रीविरोधात पोलीसांनी जोरदार मोहीम उघडली आहे. शहरातील शहरातील एसटीस्टँड व रामनाथ येथील दोन पानटपरयांवर टाकलेल्या धाडीत पोलीसांनी ११ हजार १५४ रूपयांचा गुटखा जप्त केला असून दोघांना अटक केली आहे.

शहरातील पान टपरीवर अवैधरित्या प्रतिबंधित असलेला गुटखा विक्री होत असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार छापे टाकले आहेत. अलिबाग एसटी स्टँड परिसरातील सरीता पान शॉप येथे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री होत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. यानंतर पोलिसांनी बुधवारी रात्री उशिरा या पानशॉपवर छापा टाकून सुरेश सकपाळ रा. तळकर नगर, रामनाथ, अलिबाग याच्याकडून ४ हजार ३२३ रूपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करून त्याला अटक करण्यात आली आहे.

रामनाथ येथील अथर्व पान शॉपवर देखील अलिबाग पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी आरोपी शैलेश पवार रा. तळकर नगर, रामनाथ रोड, अलिबाग याच्याकडून ६ हजार ८३१ रूपयांचा प्रतिबंधित केलेला गुटखा जप्त केला आहे. या दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अलिबागचे पोलीस उपनिरीक्षक एस. एच. भुंडेरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी ही कारवाई केली.

## वटपौर्णिमेला मअंनिसचे वृक्षरोपण उपक्रम

**पेण :** वटपौर्णिमेचे औचित्य साधून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण शाखेच्या वतीने पेण मधील रिंग रोडच्या बाजूला वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



आपण आपल्या जोडीदारच आयुष्य वाढविण्याबरोबरच पृथ्वीतलावरील सर्वच सजीवांच आयुष्य वाढविणे आणि पृथ्वीचे वातावरण संतुलित ठेवणे हाच या कार्यक्रमाचा उद्देश्य होता.

यावेळी उपस्थित महिलांकडून प्रश्नावली असणारा फॉर्म भरून घेण्यात आला. आजची महिला आजचा दिवस कोणत्या दृष्टीकोनातून पहाते याबाबत माहिती घेण्यात आली.

## सिडको तर्फे विविध संवर्गांतील पदांसाठी परिक्षा प्रक्रिया संपन्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळाने विविध संवर्गाअंतर्गत रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवली होती. त्याअंतर्गत मे.आयबीपीएस यांच्या सहयोगाने दि. १० जून २०२५ रोजी मुंबई, पुणे, नाशिक, रायगड, मिरा भाईंदर येथीलविविध परीक्षाकेंद्रांवर आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षांची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून सिडकोने रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. अनेक अनुभवी,हुशार व आपल्या विषयाचे उत्तम ज्ञान असलेल्या उमेदवारांचे सिडकोसारख्या आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या महामंडळामध्ये काम करण्याचे स्वप्न साकार होणार असल्याचे सिड्कोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल यांनी सांगितले.

## शालेय विद्यार्थ्यांसाठी मास्टरशेफ स्पर्धा



**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे नुकतेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी मास्टरशेफ स्पर्धा उत्साही वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये पाककलेची आवड निर्माण करणे, त्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास व स्वावलंबन यांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या अनोख्या स्पर्धेत इयत्ता १ली व २री मधील विद्यार्थ्यांनी न फोडणी/शिजवण नसलेले अन्न या संकल्पनेवर आधारित विविध पदार्थ सादर केले. यामध्ये स्प्राऊट्स भेळ, चाट, फ्रूट सॅलड, सँडविच, आलू चाट, अंजीर रोल्स यांसारख्या कल्पक, आकर्षक आणि पौष्टिक रेसिपीजचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी स्वतःची भांडी, साहित्य, मास्टरशेफ टोप आणि एप्रन घेऊन, रेसिपी सादर करताना सजावट, रंगसंगती, पोषणमूल्य व सौंदर्य यांचे सुंदर दर्शन घडवले. प्रत्येक रेसिपीसोबत माहितीपुस्तिकाही सादर करण्यात आली. या उपक्रमाचे खास आकर्षण ठरले 'फोटो बूथ', जिथे विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी मास्टरशेफ लूकमध्ये सुंदर क्षण टिपले.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य मुकेश ठाकू यांनी सांगितले, उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, आरोग्याची जाणीव व कलात्मकता यांचा सुरेख समन्वय साधला गेला आहे. अशा उपक्रमांतूनच खऱ्या अर्थाने आनंददायी शिक्षण साध्य होते.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व अंमलबजावणी शिक्षिका अश्विनी कांबळे यांनी केले होते

## पावसाच्या द्डीने शेतकरी चिंतेत दमदार पावसाची प्रतिक्षा

**खोपोली: प्रतिनिधी**

मान्सून प्रत्येक्षात सुरू झाल्यापासून खोपोली व परिसरात अद्याप मुसळधार पाऊस झालेला नाही. मागील महिन्यात कोसळलेला बे मौसमी पावसाने शेतीची पूर्व मशागत व डोंगर रान हिरवी झाली आहेत, मात्र भात पेरणीसाठी आवश्यक मान्सूनी पाऊस अद्याप पडलेला नाही. दररोज निर्माण होत असलेले पावसाळी वातावरणाच्या भरवश्यावर अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी ची कामे उरकली असून, भाताची पेरणी होण्यासाठी दमदार पाऊसाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना आहे.



मात्र जुन महिन्यात अद्याप ही पाऊसाची द्डी कायम आहे. येत्या दोन तीन दिवसांत मुसळधार पाऊस येईल अशी आशा शेतकऱ्यांना असून , तो आभाळाकडे डोळे लावून आहे .दरम्यान शेतीतज्ञ व हवामान खात्याने पेरणी करण्याची घाई करू नका असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे. यावर्षी मे महिन्यात मोठ्या प्रमाणात मान्सूनपूर्व पाऊस कोसळला असल्याने, शेतीच्या कामांना वेळेपूर्वी सुरुवात झाली. शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पूर्णत्वास आणली आहे. भात पेरणीची तयारी झाली असून दमदार पाऊसाची प्रतिक्षा मात्र आहे.

पुढील दोन तीन दिवसांत मान्सून सक्रिय होईल व संपूर्ण रायगडसह राज्यात दमदार पाऊस पडेल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे पेरणीची घाई न करता योग्य पाऊस पडल्यावर व मान्सून नियमितपणे सक्रिय झाल्यावरच पेरणीची कामे हाती घेण्याचा सल्ला कृषी तज्ञांनी दिला आहे.

## प्रत्यक मराठी माणसाने उद्योग क्षेत्रात काम करावे

### हभप रामदास महाराज पाटील

**चौक : प्रतिनिधी**

नोकरीचा काळ गेला नोकरी करण्यापेक्षा नोकरी देण्याचे काम प्रत्येक मराठी माणसाने करावे असे उदगार ज्येष्ठ कीर्तनकार, रायगड भूषण रामदासमहाराज पाटील यांनी काढले. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योगपती गणपत ठाकूर यांच्या दांड फाटा येथील सरिता हार्डवेअर आणि इलेक्ट्रिक दुकानाचे उद्घाटन रामदास महाराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले त्या प्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले धाडस आणि कष्ट करण्याची ताकद अंगी असल्यावर मागे वळून बघण्याची गरज नाही.

या वेळी भाजप नेते परशुराम मुरकुटे, बाळकृष्ण लबडे,पोलीस निरीक्षक अशोक थिटे, दत्तात्रय ठाकूर, स्वप्नील ठाकूर, सागर ठाकूर, दत्तात्रय पाटील यांच्यासह उद्योग क्षेत्रातील,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हार्डवेअर आणि इलेक्ट्रिक सर्व प्रकारचे साहित्य या ठिकाणी उपलब्ध होणार आहे.



पान १ वरून

## पंतप्रधान मोदी सरकारच्या ११ वर्षांत भारताचा ऐतिहासिक कायापालट

माजी नगरसेवक गणेश कडू, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रूपेश धुमाळ, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, सुनील पाटील, यतीन पाटील, विश्वजीत पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकारांना माहिती देताना पुढे सांगितले कि, नेतृत्व आणि जनभागीदारीतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४० कोटी भारतीयांसोबत देशाच्या परिवर्तनाचा प्रवास केला आहे. २०१४ पूर्वी जे अशक्य वाटत होते, ते आज शक्य झाले आहे. यामागे निर्धार, पारदर्शकता, आणि परिणामकारक धोरणांची अमलबजावणी महत्वाचे ठरले आहे. सेवा आणि सुशासन हा एक नवा दृष्टिकोन घेत मोदी सरकारने शासन म्हणजे सेवा ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. सुशासनाला संस्कृती म्हणून स्वीकारले असून तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांची हमी दिली आहे. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अर्थात डीबीटी प्रणालीमुळे योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत आहेत. त्याचबरोबरीने जीएसटीमुळे करव्यवस्थेतील सुसूत्रता वाढली आणि भ्रष्टाचाराला आळा बसला.तसेच कलम ३७० हटवून जम्मू-काश्मीरचा असलेला बंध अधिक दृढ करण्यात आला. गरीब कल्याणासाठी प्राथमिकता आणि कृती करण्यात आली. गरीब कल्याण हे मोदी सरकारच्या धोरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अनेक योजना राबवून सामान्य माणसाच्या जीवनमानात परिवर्तन घडवून आणले गेले आहे. आयुष्मान भारत योजना पाच लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार, प्रधानमंत्री उज्वला योजना स्वयंपाकाच्या गॅससाठी मोफत कनेक्शन, जनधन योजना बँकिंग सेवांचा सर्वसामान्यांपर्यंत विस्तार, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, किसान सन्मान निधी अशा विविध योजना गरीब, ग्रामीण व शेतकरी समाजासाठी प्रभावी उपक्रम ठरले आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, एका बाजूला सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी मानून काम करतानाच राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्णताही सिद्ध केली आहे. ऑपरेशन सिंदूर द्वारे भारताच्या शौर्याची प्रचिती जगाला झाली. शस्त्रास्त्र, क्षेपणास्त्र भारतात बनवले गेले.' मेक इन इंडिया' अंतर्गत संरक्षण उत्पादनांची देशांतर्गत निर्मिती व निर्यात वाढली. सरकारची संपूर्ण ताकद सैन्याला देण्यात आले तसेच दहशतवाद्यांना त्यांच्या देशात घुसून दिलेलं उत्तर भारताच्या निर्धाराचे प्रतीक बनले आहे. आर्थिक प्रगती आणि जागतिक स्थान लक्षात घेता २०१४ मध्ये भारताची अर्थव्यवस्था जगात १० व्या क्रमांकावर होती. आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे, आणि तिसऱ्या क्रमांकाच्या दिशेने वाटचाल करत आहे. आयातऐवजी निर्यातीमध्ये वाढ करत देशाचा विकास अधिक होत आहे. त्याचबरोबरीने मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडियासारखे उपक्रम राबवत आपला भारत देश आत्मनिर्भर झाला आहे, आणि हि बाब अत्यंत अभिमानास्पद असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगत आपला भारत समृद्ध तर होतच आहे पण त्याचबरोबरीने संरक्षण सामर्थ्यवानही बनला आहे, असेही त्यांनी नमूद केले. या काळात संस्कृती आणि अस्मिता जपण्याचे कार्यही चांगल्याप्रकारे झाले आहे. राम मंदिर निर्मिती, काशी विश्वनाथ कॉरिडॉर अशा विविध उपक्रमांतून सांस्कृतिक पुनरुत्थानाला चालना देण्याबरोबरच आधुनिकतेसह भारताची संस्कृती व परंपरा यांचे जतन करण्याचे कामही या निमित्ताने झाले असून मोदी सरकारचा कार्यकाळ हा सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या स्तंभांवर आधारलेला आहे.

भ्रष्टाचारमुक्त कारभार, पारदर्शक प्रशासन, तंत्रज्ञानाचा वापर आणि सर्वसमावेशक विकास ही वैशिष्ट्ये या कालखंडात ठळकपणे दिसून आली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यशाचे श्रेय स्वतःकडे न घेता १४० कोटी भारतीयांना दिले आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या मंत्राने भारताने विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने भक्कम पावले टाकली आहेत, असे सांगत जगात सर्व क्षेत्रात देशाचे नाव उंचावण्याचे काम कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने केले आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित करत मोदी सरकारच्या कार्याची माहिती देऊन लोककल्याणकारी निर्णयांबद्दल आभारही व्यक्त केले.

## सांगलीतील 'त्या' हत्येचे गूढ उकलले

संध्याकाळी तिला त्याने आणायला गेला आणि घरी घेऊन आला. त्यावेळी त्याने शरीर संबंध ठेवण्याची मागणी केली, मात्र राधिका नकार देऊ लागली. पण अनिल शरीर संबंध ठेवणार याची भीती तिला वाटू लागली. रात्री अनिल झोपल्यावर राधिका पाणी प्यायला उठली आणि येताना कुऱ्हाड गेऊन आली. अनिलला काही समजण्याआधीच तिने डोक्यात घाव घालून त्याला संपवले लग्नाला महिना सोडा पण वटपोर्णिमेच्याच दिवशी राधिकाने आपल्या नवऱ्याला मारून टाकले.

## राज्यातील सिंचन व जलविद्युत प्रकल्पांची कामे पूर्ण करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

या प्रकल्पाच्या माध्यमातून अधिकचे सिंचन क्षेत्र निर्माण होणार असल्याने राज्यातील शेतकऱ्याचे जीवन अधिक सुसह्य होईल. उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्वारे पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाला विलंब होऊ नये.

शासनाने दोन वर्षांपासून विविध सिंचन प्रकल्पांच्या १८५ कामांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून २६ लाख ६५ हजार ९०९ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. तर विशेष दुरुस्तीसाठी १९६ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. विशेष दुरुस्तीच्या माध्यमातून चार लाख दोन हजार ७६४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

ऊर्जा स्वावलंबनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पंपस्टोरेज धोरणांतर्गत केलेल्या सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील १५ कंपन्यांसोबत तीन लाख ४१ हजार ७२१ कोटीचे २४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामुळे राज्यात ६२ हजार १२५ मेगावॅट वीज निर्मिती होऊन ९६ हजार १९० रोजगार निर्माण होणार आहे.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणातून प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पांची झालेले कामे व निर्माण झालेले सिंचन क्षेत्र याची माहिती दिली.

# पेरण्या वाया जाण्याची भीती

**उरण : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांनी सुक्या पेरण्या केल्या आहेत, मात्र सध्या पावसाने दडी मारली असल्याने पेरण्या वाया जावू नये यासाठी या पेरण्यावर कापडी आच्छादन टाकले आहे. घरातील साड्यांचा वापर शेती सुरक्षित ठेवण्यासाठी करण्यात येत आहे.

यावर्षी मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे, मात्र पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या भाताच्या सुक्या पेरण्या वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. तप्त जमीन आणि त्यात पेरणी केलेले धान्य या उष्णतेमुळे आणि त्यानंतर आलेल्या जोरदार पावसामुळे भाताचा अंकुर फुटण्यास मदत होते. यासाठी शेतकरी भाताच्या सुक्या पेरण्या करतात. मात्र या वेळी अगोदरच पावसाला सुरुवात झाली आहे. पेरणी वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




### *दोन हजार ४०० हेक्टरवर भात पीक*

*उरण तालुक्यात जवळपास दोन हजार ४०० हेक्टर जमिनीवर भात पीक घेतले जात आहे, मात्र अवकाळी, अती पाऊस, नापिकी शेती आदी संकटे वारंवार येऊनही शेतकरी शेती करीत आहेत. मेमधील पावसानंतर पुन्हा एकदा दडी मारल्याने शेतकरी धास्तावले आहेत. अनियमित पावसाचा सामना करीत येथील शेतकरी कष्टाने व नेटाने शेती करीत आहे.*

# मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील उतार रस्ता धोकादायक

## ◆ सार्वजनिक बांधकाम खात्याने लक्ष देण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा प्रवेशद्वारालगतचा उतारावरील रस्तावर खडी दगड वर आल्याने किरकोळ अपघात रोजचे होत आहेत. शिवाय आसपास रस्त्याला खड्डे पडल्याने मोठी जिवितहानीची शक्यता नाकारता येत नाही. मोहोपाडा प्रवेशव्दाराच्या रस्त्याला ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

या रस्त्यावरुन रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे वाहनांची रोजची रेलचेल



असल्याने मोठ्या अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. दांड रसायनी रस्त्याचे वर्षापुर्वीच डांबरीकरण झाले. मोहोपाडा प्रवेशद्वारासमोर रस्त्याचा उताराला व्यवस्थित न केल्याने खडी बाहेर आल्याने दुचाकी घसरुन अपघात होत आहेत.

या रस्त्यावरुन प्रवास करताना वाहन चालकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. शिवाय उतारावरच वळण असल्याने या रस्त्यावर अपघात होऊन वाहनचालकांना जखमी व जीवितहानी होण्याचा धोका वाढला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत. या उतारावर मोठा अपघात झाल्यास सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.

## निवडक

### तक्का येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता



एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार तिच्या पतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. माधुरी सुभाष सहानी (वय १८, रा.तक्का) उंची साडे चार फुट, रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा सडपातळ, सोबत मोबाईल फोन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतराव यांच्याशी संपर्क साधावा.

### लोकशाही दिनाचे आवाहन

**पनवेल :** महानगरपालिकेमार्फत मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार किंवा या दिवशी सुट्टी असल्यास, त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. त्यानूसार पुढील महिन्यातील ७ जुलै रोजी महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन साजरा करण्यात येणार आहे. लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी नागरिकांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. तसेच तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

### साडेतीन कोटींची संपत्ती उघड

**पनवेल :** व्यावसायिकाकडून मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात चार लाखांची लाच स्वीकारणाऱ्या नवी मुंबईच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाची संपत्ती उत्पन्नापेक्षा तब्बल २९७ टक्क्यांहून अधिक असल्याचे समोर आले आहे. मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या चौकशीत साडेतीन कोटींची मालमत्ता समोर आली असून उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नवी मुंबई पोलीस दलाचे पोलीस आयुक्त मिलिद भारंबे यांनी पदभार स्वीकारताच सर्व पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना लाचखोरी बंद करण्याचे निर्देश दिले. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात एका बांधकाम व्यावसायिकाकडून एन.आर.आय. पोलीस ठाण्याच्या तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम याला चार लाख रुपयांची लाच स्व्वीकारताना अटक करण्यात आली होती. सतीश कदम याच्या मागील ११ वर्षांच्या काळातील आर्थिक चौकशीमध्ये उत्पन्नापेक्षा अधिक बेहिशेबी मालमत्ता सापडली. बाजारमूल्य तीन कोटी ४८ लाख ४० हजार रुपये आहे.

# वहाळ येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विकास कामांचा दृष्टिकोन ठेऊनच काम केले असून, त्यात कोणतेही राजकारण आणले नाही, असे प्रतिपादन माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वहाळ येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या वेळी केले. वहाळ येथील श्री साई देवस्थान मंदिरात झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त





प्रतिसाद लाभला.

श्री साई देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रविशेठ पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी भेट दिली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थितांशी संवाद साधत अनेक आठवणींना उजाळा दिला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, श्री साई देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रवीशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, उलवा नोड अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# रक्तदाता दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील रक्तदात्यांचा सन्मान

**उरण : बातमीदार**

जागतिक आरोग्य संघटना (WHO)द्वारे दरवर्षी १४ जून हा जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महान शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टीन यांचा जन्मदिन. त्यांनी मानवी रक्तात एग्ल्यूटिनिनच्या अस्तित्वाच्या आधारे रक्ताचे ए बी आणि ओ असे वेगवेगळ्या गटात वर्गिकरण केले. ह्या महत्वाच्या वैद्यकीय शोधासाठी त्यांना १९३० साली नोबेल पूरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



जागतिक रक्तदाता दिनाचे महत्व सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादनांच्या गरजेबद्दल जागतिक जागरूता वाढविणे आहे. हा दिवस ऐच्छिक, न चुकता रक्तदान करणाऱ्याचे आभार मानण्याचा दिवस. आणि ह्याच उद्देशाने महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे आणि वटवृक्ष सामाजिक संस्था उलवे यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील ज्या ज्या रक्तदात्यांनी रुग्णसेवेसाठी रक्तदान केले आहे त्या त्या रक्तदात्यांना आदर्श रक्तदाता रायगड हे ई सन्मानपत्र देवून गौरविण्यात येणार आहे.

१ जानेवारी २०२४ ते १४ जून २०२५ ह्या कालावधीत रक्तदात्यांनी रक्तदान केल्याचे प्रमाणपत्र अथवा फोटो आणि पूर्ण नाव ९८७०९५५५०५ ह्या व्हॉटस्अप क्रमांकावर १५ जून पर्यंत नोंदणी करायची आहे असे वटवृक्ष संस्थेचे किरण मढवी यांनी सुचित केले आहे. त्याचप्रमाणे वैद्यकीय शस्त्रक्रीया तसेच ज्यांच जीवन एखाद्या गंभीर आजारामुळे धोक्यात आहे. त्यांना योग्यवेळी रक्त उपलब्ध झाल्यास त्यांचे जीव वाचू शकतो.

भारतात रक्तामुळे दरवर्षी लाखो जीव वाचण्यास मदत होते. हे केवळ रक्तदात्यांच्या अमुल्य योगदानामुळेच आणि म्हणूनच ह्या महान कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही एक उपक्रम राबवीत आहोत, असे या वेळी रायगड भुषण तथा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते मनोज पाटील यांनी मत व्यक्त करून सर्व रक्तदात्यांचे व रक्तदान शिबीर आयोजन करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानून शुभेच्छा दिल्या.

# कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त परिवाराची कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

कोयना प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या समस्या सोडवण्याकरिता ठाणे, रायगड जिल्ह्यातील पाचगाव कदम ग्रामस्थ एकत्र आले आहेत. गावातील ग्रामस्थांच्या उद्भवणाऱ्या समस्या शासन दरबारी सोडवण्याकरिता वेळे, करंजवडे, जांब्रुक, रोहिणे, भवानी नगर या पाचगावातील नागरिकांनी एकत्र येत कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त कदम परिवार या संघटनेची स्थापना करून कार्यकारिणीची निवड केली.



ठाणे विश्रामगृह येथील बैठकीत कोयना पंचरत्न प्रकल्पग्रस्त कदम परिवाराच्या कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष मुकुंद कदम (वेळे), उपाध्यक्ष संजय कदम (भवानी नगर), सचिव सदानंद कदम (जांब्रुक) वांवढळ, खजिनदार अमोल कदम (करंजवडे/भिवंडी), सहसचिव सूर्यकांत कदम (रोहिणे/आनगाव), सहखजिनदार मंदार कदम (वेळे), तसेच कार्यकारिणी सदस्यपदी सुनील कदम (वेळे), प्रमोद पवार (भवानी नगर), संतोष कदम (जांब्रुक/वावंढळ), बाळकृष्ण कदम (रोहिणे/आनगाव), अनंत कदम (रोहिणे/माणगाव), भगवान कदम (रोहिणे/माणगाव), सुभाष कदम (धरणा कॅम्प), निलेश कदम (वेळे), दिलीप कदम (रोहिणे), सल्लागारपदी धनंजय कदम (वेळे), शशिकांत कदम (वेळे), आनंद कदम (करंजवडे/भिवंडी), निलेश कदम (जांब्रुक/वावंढळ), सतीश कदम (भवानी नगर) यांची निवड करण्यात आली.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. यानिमित्त रुशीराज सुर्यवंशी आणि स्वराज जगताप यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पनवेल येथील त्यांच्या निवास्थानी भेट देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**



**पनवेल : बेस्ट उपक्रमात दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झालेले अनिल गमरे यांनी आता वकिलीचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागूबाई चांगू विधी विद्यालयातून त्यांनी एल.एल.बी.ची पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या यशामुळे शिक्षण आणि कठोर परिश्रमाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अनिल गमरे यांच्या या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, नवनाथ जाधव आणि सचिन खरात उपस्थित होते.**

# उरण बाजारात करांदे कापांची विक्री

### आदिवासींना मिळतोय रोजगार

**उरण : वार्ताहर**

पावसाळा सुरू झाला की डोंगर माथ्यावर पावसाळ्यातील पाण्यावर जंगलात औषधी रानभाज्या उगवतात. रानभाज्या औषधी असल्याने व वर्षातून एकदाच मिळणाऱ्या भाज्या व नैसगिक असणारी व कोणतेही रासायनिक खते न वापरता नैसर्गिक वातावरणात उगवणारी औषधी कंद, पालेभाज्या असल्याने नागरिक खरेदी करीत असतात. अशीच एक कंदभाजी करांदे. हीची





काप करून विक्री केली जाते.

करांदेच्या कपच्या (काप) उरण बाजारात राजपाल नाका येथे विकावयास आल्या असून त्या खरेदी करण्यासठी नागरिकांची गर्दी असते. वर्षातून एकदाच खाण्यास मिळत असल्याने आम्ही दर वर्षी घेत असतो, असे नागरिकाने सांगितले. पावसाळा सुरुवात झाली की, डोंगर माथ्यावर करांदेची वेल येथे वेळ मोठी झाल्यावर वेलीच्या खालच्या भागात जमिनीत करांदे येतात. आदिवासी,कातकरी लोकांना त्या वेलेची माहिती असल्याने ते मातीत खोदुन करांदे बाहेर काढले जातात. या करांद्यांना कापतात त्यांना कपच्या म्हणतात. कपच्या त्यावर राख लावली जाते. ३० मिनिटे ठेवल्यानंतर ते गरम पाण्यात उकळवीतात. कपच्या कडू लागू नये, म्हणून पाण्यात आपटेंच्या झाडाची पाने टाकतात व ३० मिनिटे उकलवितात. नंतर तीन वेळा स्वच्छ पाण्याने धुतात व नंतर बाजारात विकाव्यास आणतात.

आम्ही गरम-गरम बाजारात विकावयास आणतो, असे उरण तालुक्यातील करंजा सातघर आदिवासी वाडी येथील मालती अनिल नाईक यांनी सांगितले. सकाळी फारच मागणी असते. ५० रुपयास वाटा अश्या भावाने आम्ही विकतो, असे मालती अनिल नाईक हिने सांगितले.

# विचुंबेतून महिला बेपत्ता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

६२ वर्षीय मंगल लक्ष्मण शिंगारे या विचुंबे येथील घरातून कोणाला काहीही न सांगता निघून गेले आहेत. मात्र त्या घरी परत न आल्याने त्या हरवली असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. या महिलेची उंची चार फूट, पाच इंच, रंग काळा सावळा, चेहरा चौकोनी आहे. केस काळे आणि पांढरे बारीक केलेले आहेत. समोरील दात अर्धवट तुटलेला असून डाव्या हातावर फुलांचे चित्र गोंदलेले आहे. या महिलेला मराठी भाषा बोलता येते. गेल्या काही दिवसांपासून या महिलेचे स्वास्थ्य बिघडलेले आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यस महिला पोलीस हवालदार एस. एस. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# कचराकुंडीमध्ये आढळले गोमांस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली, सेक्टर १२ येथील कचराकुंडीमध्ये गोमांस सापडल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत समाजकंटकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाने कळंबोली पोलिसांकडे केली आहे.

कळंबोली, सेक्टर १२ येथे कचराकुंडीमध्ये कत्तल केलेल्या गो मांसाचे तुकडे सापडून आले आहेत. या प्रकाराची माहिती मिळताच भारतीय जनता पार्टी रायगड भटके विमुक्त आघाडी रायगड जिल्हा अधक्ष बबन बारगजे यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत ज्या समाजकंटकांनी हा प्रकार केला आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी कळंबोली पोलीस ठाण्यात केली आहे.

या वेळी सुभाष फड, महेश बारगजे, महेश माने, दिनेश तिडके, प्रतीक झाडे, राहुल चाटे, ज्ञानेश्वर उगलमुगले, परमेश्वर बारगजे, गणेश पिसाळ, मनिष भोईर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# धक्कादायक, दुर्दैवी!

एअर इंडियाचे अहमदाबादमधील दुर्घटनाग्रस्त बोइंग ७८७ ड्रीमलाइनर विमान हे जगभरात अत्यंत सुरक्षित गणले जाणारे व अत्याधुनिक प्रणालीवर चालणारे विमान असल्यामुळे ते कोसळल्याबद्दल जगभरातच धक्क्याची प्रतिक्रिया उमटली आहे. लंडनकडे निघालेल्या या विमानात १२ क्रू सदस्यांसह २४२ प्रवासी होते. यात १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि १ कॅनडाचा नागरिक असल्यामुळे देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही या अपघाताबद्दल तीव्र दु:खाची प्रतिक्रिया व्यक्त होते आहे.

**गुजरातमधील अहमदाबाद विमानतळावरून गुरुवारी दुपारी लंडनकडे निघालेले एअर इंडियाचे बोइंग विमान उड्डाणानंतर पुरेशी झेप न घेता अवघ्या काही मिनिटांतच खाली कोसळले आणि त्यानंतर उठलेला आगीचा लोळ इतका प्रचंड होता की या दुर्दैवी घटनेत विमानातील सर्व २४२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती प्राथमिक मदतकार्यानंतर व्यक्त करण्यात आली. परंतु विमानातील एक प्रवासी आश्चर्यकारकरित्या बचावल्याचे रात्री स्पष्ट झाले. हे विमान विमानतळानजीकच्या बीजी मेडिकल कॉलेजच्या होस्टेलच्या इमारतीवर कोसळल्याने या दुर्दैवी घटनेच्या भीषणतेत भरच पडली. काही वैद्यकीय विद्यार्थीही या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडले असून अनेक जखमींना तेथील सिव्हिल इस्पितळात दाखल करण्यात आले आहे. विमान अपघातातील बहुतेक मृतदेह जळून खाक झाल्यामुळे मृतांची ओळख पटवणे कठीण जाणार आहे. त्यामुळे डीएनए टेस्टिंगची व्यवस्था करण्यात आली असून मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना बोलावून डीएनएद्वारे ओळख पटवली जाणार आहे. उड्डाणानंतर मिनिटभरातच या दुर्दैवी विमानाच्या वैमानिकाने 'मेडे'चा सिग्नल दिला होता. हा एक आंतरराष्ट्रीय संकट संकेत असून विमान वाहतुकीच्या क्षेत्रात मेडे कॉल हा तात्काळ गंभीर संकटाचा इशारा मानला जातो. सुमारे ८ हजार २०० तासांच्या विमानउड्डाणाचा अनुभव असलेले कॅप्टन सुमीर सभरवाल हे या विमानाचे वैमानिक होते. अत्यंत सुरक्षित आणि शक्तिशाली गणल्या जाणाऱ्या या विमानाला अपघात झाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. उपलब्ध व्हिडिओंच्या आधारे तज्ज्ञांकडून प्राथमिक कयास बांधले गेले असले तरी ब्लॅकबॉक्स सापडल्यानंतर अपघातामागील कारणे स्पष्ट होऊ शकतात. दुपारी १.३८ ला उड्डाण केल्यानंतर विमानाला पुरेशी उंची गाठता आली नाही व अवघ्या तीन मिनिटांत ते कोसळले. दुर्घटनेनंतर स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू परिस्थितीकडे लक्ष ठेवून होते. अमित शहा आणि नायडू या दोघांनीही अहमदाबादला पोहोचून जातीने परिस्थितीचा आढावा घेतला. जखमींना तातडीने रुग्णालयात पोहोचवून शक्य तितक्या जणांचे प्राण वाचवण्याला प्राधान्य देण्यात आले. प्रवाशांच्या नातेवाईकांना माहिती उपलब्ध करून देण्याचीही संवेदनशीलतेने काळजी घेण्यात आली. पंतप्रधानांनी जातीने उपस्थित राहून परिस्थितीकडे लक्ष देण्याची सूचना केल्याचे नायडू यांनी नमूद केले. या विमान दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांचे निधन झाल्याचे संध्याकाळी सांगण्यात आले. दुर्घटनेत प्राण गमावलेली प्रत्येक व्यक्ती आपल्यासाठी महत्त्वाची व्यक्ती आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी सरकारकडून केली जाईल. त्यास जबाबदार असलेल्या कुणाचीही गय केली जाणार नाही असेही नायडू यांनी ठामपणे सांगितले आहे. हवाई अपघातांमध्ये प्रत्येक अपघातातून सुरक्षिततेच्या दृष्टीने आणखी काय सुधारणा करता येईल याकडेही बारकाईने लक्ष दिले जाते. त्यादृष्टीनेही या अपघाताचे विश्लेषण केले जाईल असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. तूर्तास या दुर्दैवी विमानअपघाताने अवघा देशच सुन्न झाला आहे.**

# अलिबागची चविष्ट तोंडली शासनदरबारी उपेक्षित





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग तालुका भात, नारळ, पांढरा कांदा, जिताडा मासा यासाठी प्रसिद्ध आहे. असलेल्या अलिबाग तालुक्यात तोंडलीचे उत्पादन देखील मोठ्या प्रमणावर घेतले जाते. पांढऱ्या कांद्याप्रमाणे अलिबाग तालुका तोंडली उत्पादनातही अग्रेसर आहे. या तालुक्यातील अनेक शेतकरी या उत्पन्नातून लखपती झाले आहेत. तोंडली उत्पादनाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पांढरया कांद्यापाठोपाठ अलिबागच्या चविष्ट तोंडलीची मुंबई बाजारात मोठी मागणी आहे. शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न देणारी अलिबागची चविष्ट तोंडली शासनदरबारी उपेक्षित आहे.

अलिबाग तालुक्यात सुरुवातीला चरी, खिडकी भागात तिची लागवड करण्यात येत असे . आता कुरुळ, वेश्वी, कार्ले, सागाव, खंडाळे, कनकेश्वरफाटा बामणगाव, बेलोशी, चिंचोटी, रामराज, कावाडे परिसरात तोंडलीचे उत्पादन घेतले जाते. गेल्या वर्षी या पिकाची २५० हेक्टरवर लागवड करण्यात आली होती. दरवर्षी तोंडलीच्या पिकाचे क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे उत्पादनातही वाढ होऊ लागली आहे. तालुक्यात सुमारे ८५० पेक्षा अधिक तोंडली उत्पादक शेतकरी आहेत. अलिबाग तालुक्यात तोंडली उत्पादन दरवर्षी वाढू लागले आहे. चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी मोठ्या संख्येने या पिकाकडे वळले आहेत. चांगल्या नफ्यामुळे भविष्यात ही आकडेवारी वाढण्याची शक्यता अधिक आहे.

अलिबागच्या तोंडलीला मुंबईतील गुजराती समाजात खूप मागणी आहे. तेथील गृहिणी विक्रेत्यांकडे अलिबागच्या तोंडलीची आवर्जून विचारणा करतात. खास करून लग्न समारंभात आणि मोठया हॉटेल्समध्ये तोंडलीची भाजी पहायला मिळते. तोंडलीला तिच्या आकाराप्रमाणे दर मिळतो. कळी, मध्यम आकाराची आणि मोठी तोंडली अशी वेगवेगळी केली जाते. अलिबागच्या स्थानिक जातीची फळे आकाराने लांबट असून तुलनेने कमी जाडीची असतात. फळांचा रंग गर्द हिरवा असून त्यावर विखुरलेल्या उभ्या रेषा असतात.

भातकापणीच संपली की पांढऱ्या कांद्याप्रमाणे शेतकरी तोंडलीची लागवड करतात. नोव्हेंबर महिन्याच्या दुसर्या आठवड्यापासून तोंडलीच्या लागवडीला सुरूवात करण्यात येते. जानेवारी महिन्यात तोंडलीचे वेल मोठे झाले की त्यासाठी मांडव घालून त्यावर वेल चढवले जातात. बाजारात जाडी व कळी अशा दोन प्रकारामध्ये वेगवेगळ्या दराने तोंडली विकली जाते. शेतकरी तोंडलीची तोड करून ती व्यापारयांच्या माध्यमातून वाशीच्या बाजारात पाठवत. मे अखेरपर्यंत तोंडलीचे उत्पन्न मिळते. त्यातून त्यांना हंगामात चांगले उत्पन्न मिळते.

तोंडलीच्या उत्पादनातून १० कोटींहून अधिक उलाढाल होते. जानेवारीपासून तोंडली बाजारात विक्रीला सुरुवात झाली आहे. त्याचा फायदा शेतकर्यांना चांगला होतो. ही तोंडली मुंबई, वाशी बाजारात देखील पाठविली जात आहेत. पुण्याच्या बाजारात जाडी तोंडली १२० रुपये किलोने विकली जात आहे. तर, कळी तोंडलीला विदेशात मागणी आहे. पॅकिंग करून तोंडली विदेशात दलालामार्फत पाठविली जातात.

असे असले तरी तोंडलीला समाधानकारक भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहे. कबाडकष्ट करून देखील तोंडलीला भाव मिळत नसल्याने शेतकर्यांसमोर मोठी आर्थिक समस्या निर्माण झाली आहे.

तोंडलीचे भाव कमी झाल्याचा फटका तोंडली उत्पादक शेतकर्यांना बसतो. अलिबागच्या तोंडलीला बाजारात मोठी मागणी आहे. जानेवारी ते जून या काळात उत्पन्न मिळते. चांगले उत्पन्न मिळवून देणारी अलिबागची चविष्ट तोंडली शासनदरबारी उपेक्षित आहे.

अलिबागच्या या तोंडलीला मुंबई, गुजरातमध्ये मागणी आहे. परन्तु तिचे उत्पादन कमी आहे. त्यामुळे शासनाने तोंडली लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तोंडली लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. पांढऱ्या कांद्या प्रमणे या तोंदलीचे वान देखील स्थनिक आहे. अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांकडेचे हे वाण आहे. या तोंडलीचे बियाणे शेतकऱ्यांना उपल्बाद होण्यासाठी शासनाकडून प्रयत्न व्हयला हवेत.

# अष्टपैलू साहित्यिक प्र. के. अत्रे

मराठी जगातील नावाजलेले सर्वांचे लाडके लेखक, नाटककार, संपादक, पत्रकार मराठी, हिंदी चित्रपट निर्मिते शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी आणि वक्ते असे बहुमुखी व्यक्तिमत्त्वाचे धनी असे प्रह्लाद केशव अत्रे म्हणजे आपले सर्वांचे आचार्य अत्रे यांचा जन्म पुरंदर तालुक्यात असलेल्या कोडीत खुर्द या गावात १३ ऑगस्ट १८८९ रोजी झाला. आचार्य हे महाराष्ट्रातील एक झंझावाती व्यक्तिमत्तव मानले जाते. त्यांनी पुणे आणि लंडन येथे उच्च शिक्षण प्राप्त केले. त्यांनी मुंबईत एका हायस्कूल मध्ये इंग्रजी आणि गणित शिकवले. मुबईतील सरकारी ट्रेनींग कॉलेजातून शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण घेऊन बी टी परीक्षेत प्रथम आले नंतर त्यांनी १९२७ ते १९२८



दरम्यान इंग्लंडला टीचर्स डिप्लोमा मिळविला. ह्यांनी पुण्यात धनराज गिरजी आणि मुलींच्या आगरकर हायस्कूलची स्थापना केली.

प्रथम 'मकरंद' व नंतर 'केशवकुमार' या टोपणनावांनी काव्यलेखन. झेंडूची फुले (१९२५) हा त्यांच्या विनोदी व विबंडन–कवितांचा संग्रह होता. महाराष्ट्रच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ते प्रमुख नेते होते. ते आपल्या वक्तृत्वाने ऐकणारे श्रोतांना भारावून टाकायचे. काही काळासाठी ते महाराष्ट्र विधानसभेतील आमदार होते. ते सामाजिक बांधिलकी, गोरगरीब, तळागाळातील माणसे, उपेक्षित दलितांचे कैवारी होते. 'आचार्य' म्हणून पदवी त्यांना प्राप्त झाली. त्यांनी २२ अशी गाजलेली नाटकं लिहिली. त्यांचा मृत्यू १३ जून १९६९ रोजी मुंबईत झाला.



## बदलते तंत्रज्ञान

### खासगी फोटो लीक झाल्यास 'या' वेबसाईटची मदत घ्या

आजकाल मोबाईल, सोशल मीडियाच्या दुनियेत कोणाचे कसले फोटो व्हायरल होतील याचा नेम नाही. काल




तर पहलगाम हल्ल्यात मृत्यू झालेल्या नौदलाच्या अधिकाऱ्याच्या पत्नीचा चेहरा लावून एआयद्वारे बनविलेला नग्न फोटो व्हायरल करण्यात आला होता. असे काही आपल्या आयुष्यात झाले तर मुली काय करतात, लाजेखातर आयुष्य संपविण्याचा प्रयत्न करतात किंवा या लोकांच्या ब्लॅकमेलिंगला बळी पडतात, परंतु जर असे झाले तर महिलांनो घाबरू नका, तुमच्यासाठी एक संस्था काम करत आहे.

जर कोणाचे खासगी फोटो लीक झाले, अश्लील फोटो लीक केले गेले, सोशल मीडिया असेल किंवा पॉर्न साईट यावरून हटविण्याचा या संस्थेचा हातखंडा आहे. आजवर या संस्थेने दोन लाखांहून अधिक फोटो इंटरनेटवरून हटविले आहेत. या संस्थेचा हे फोटो डिलीट करण्याचा दर हा ९० टक्के आहे. म्हणजे केवळ १० टक्केच प्रकरणांत अपयश आलेले आहे. ही आंतरराष्ट्रीय संस्था आहे SWGfL.

या संस्थेची मोफत सुविधा StopNCII.org या वेबसाईटवर मिळते. ही बातमी वाचणारे वाचक महिला असेल किंवा पुरुष दोघांनीही ही माहिती लक्षात ठेवा, तुमच्या मैत्रिणी, बहीण किंवा मित्रांना लगेचच पाठवा. एखाद्याचे अख्खे आयुष्य यावर अवलंबून आहे. अख्खे कुटुंब अशा प्रकारांमुळे उध्वस्त होऊ शकते. StopNCII म्हणजे स्टॉप नॉन–कन्सेन्सुअल इंटिमेट इमेज अॅब्यूज आहे. SWGfL चा भाग असलेल्या रिव्हेंज पॉर्न हेल्पलाइनद्वारे हे टूल चालवले जाते.

या वेबसाईटवर जाऊन तुम्हाला तुमची तक्रार द्यावी लागणार आहे. यामध्ये तुमचे तसले फोटो असलेली पोस्टची लिंक किंवा व्हिडीओ द्यावा लागतो. एक हॅशिंग अल्गोरिदम वापरला जातो आणि त्याद्वारे त्याची एक व्हॅल्यू तयार केली जाते व आपल्या सोबत असलेल्या जगभरातील कंपन्यांना ती पाठविली जाते. यानंतर ती हॅशव्हॅल्यू ज्या कंटेंटसोबत मॅच होईल तो कंटेंट हटविला जातो. एवढेच नाही तर भविष्यात जरी कोणी तुमच्या नावाने किंवा त्या संदर्भाने सर्च केले किंवा काही तसेच अपलोड केले तरी ते डिलीट केले जाते. ही प्रक्रिया निरंतर सुरुच राहते. या संस्थेची साथ फेसबुक, इन्स्टा, टिकटॉक, पॉर्नहब, ओन्ली फॅन्ससारख्या मोठमोठ्या वेबसाईटही देत आहेत. यामुळे ही वेबसाईट पहा आणि मित्र मैत्रिणींना शेअरही करा.

# शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर

वास्तववादी शैलीत दर्जेदार स्मारकशिल्पे घडविणारे आधुनिक काळातील एक ख्यातकीर्त महाराष्ट्रीय शिल्पकार म्हणजे विनायक पांडुरंग करमरकर. नानासाहेब या नावाने ते अधिक परिचित होते. आज त्यांचा स्मृतिदिन त्यांचा जन्म अलिबागजवळील सासवणे (तत्कालीन जि. कुलाबा, सांप्रत जि. रायगड) येथे २ ऑक्टोबर १८९१ रोजी झाला. गणपतीच्या मूर्ती घडविणे हा त्यांच्या कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय होता.

साहजिकच बालवयातच विनायक करमरकर यांना कलेची आवड निर्माण झाली तसेच चित्रकलेतदेखील त्यांना गती होती. ते देवळातील भिंतींवर चित्रे काढत असत. ही चित्रे तत्कालीन कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ओटो रॉथफिल्ड यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी करमरकरांना सर. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे कलेचे शिक्षण घेण्यास आर्थिक मदत देऊन प्रवृत्त केले (१९१०). त्यांनी जी.डी. आर्ट ही पदविका घेतली (१९१३). 'जे. जे.'मध्ये त्यांना उत्तम शिल्पकृतीबद्दल लॉर्ड मेयो पदक मिळाले. याच काळात त्यांची ओळख सर्जन डॉ. भाजेकर आणि रवींद्रनाथ टागोरांचे नातू सुरेंद्रनाथ यांच्याशी झाली व त्यांच्या आग्रहाखातर ते कोलकात्याला गेले. तेथे त्यांनी झांवबझार येथे स्वत:चे कलामंदिर (स्टुडिओ) उभारले. याच



**निमित्त**

सुमारास त्यांनी पूर्वाश्रमीच्या येसू परांजपे या युवतीशी लग्न केले (१९१८).


करमरकरांनी बेलूर मठातील रामकृष्ण परमहंसांचा पुतळा बनविला (१९१६–२०). त्यामुळे त्यांना बरीच कामे मिळू लागली. त्यांनी शास्त्रज्ञ पी.सी.रे, देशबंधू चित्तरंजनदास यांची व्यक्तिशिल्पे केली. महात्मा गांधीजींना समोर बसवून त्यांचे शिल्प केले. व्यावसायिकदृष्ट्या ते कोलकात्यात स्थिरावले असतानाच उच्च शिक्षणासाठी ते लंडनला गेले (१९२०). यासाठी वाडिया व टाटा ट्रस्ट यांच्याकडून कर्जाऊ शिष्यवृत्ती तसेच भाजेकर, राव, शिल्पकार म्हात्रे यांचे आर्थिक साहाय्य घेतले. लंडन येथील रॉयल अकॅडमी ऑफ आर्टमधून उच्च शिल्पशिक्षण, विशेषत: ब्राँझ कास्टिंगचे तंत्र, त्यांनी आत्मसात केले. प्रसिद्ध चित्र–शिल्पकारांच्या भेटी व त्यांच्या कलाकृती पाहण्यासाठी त्यांनी फ्रान्स, इटली व स्वित्झर्लंडचे दौरे केले आणि नंतर ते भारतात परतले (१९२२). करमरकर यांनी साकारलेल्या शंखध्वनी करणाऱ्या युवतीच्या शिल्पास फाइन आर्ट सोसायटीचा (कोलकाता) प्रथम पुरस्कार मिळाला. नंतर त्यांनी गोंडल (सौराष्ट्र), बडोदे व अखेरीस मुंबई येथे शिल्पव्यवसाय सुरू केला (१९२५).

अखिल भारतीय शिवस्मारक समितीचे अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी करमरकरांना पुणे येथील अश्वारूढ शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम दिले. करमरकरांनी एकसंध ओतकामाचे धाडस करून तो पुतळा तयार केला. शिल्पकला क्षेत्रातील हा विक्रमच त्यांनी प्रस्थापित केला. हा पुतळा करण्यापूर्वी त्यांनी शिवचरित्राचा अभ्यास केला होता. या पुतळ्यामुळे त्यांना दिगंत कीर्ती लाभली (१९२८). माकेंझी अँड मॅजेनॉन या कंपनीच्या फौंड्रीत हे ब्राँन्झमधील शिल्प त्यांनी घडवले. या शिल्पाचे वजन आठ टन व उंची सुमारे चार मीटर आहे.

इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथे शिवाजी महाराजांचे शिल्प साकारतानाच्या काळात त्यांचे १३ जून १९६७ रोजी निधन झाले. अलिबागमधील सासवणे येथील शिल्पकार करमरकर शिल्पालय हे त्यांचे संग्रहालय आहे. (साभार : मराठी विश्वकोष)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### डोकं दुखतं, ॲसिडीटी वाढते? 'हा' उपाय करून पहा...

'आज माझं खूपच डोकं दुखत आहे', 'डोकं पार ठणकायला लागलं आहे..', 'ॲसिडीटीचा भयंकर त्रास होतो आहे..' अशी वाक्यं आपण आपल्या आसपासच्या महिलांकडून नेहमीच ऐकत असतो. किंवा आपणही ती नेहमीच म्हणत असतो. काही महिलांचं तर आठवड्यातून तीन–चार वेळा हमखास डोकं दुखतं. त्यामुळे तर बऱ्याचदा त्यांच्या जवळच्या व्यक्तींकडून याबाबत त्यांची चेष्टाही केली जाते.



डोकेदुखीसाठी इतरही अनेक कारणं आहेतच, पण ॲसिडीटी वाढल्यामुळे डोकं दुखण्याचं प्रमाण खूप जास्त आहे.

काही जणांना खाण्यापिण्याच्या पदार्थांमध्ये, सवयींमध्ये किंचित बदल झालेलाही चालत नाही. त्यांना लगेच सिडीटी होते आणि मग डोकेदुखी छळू लागते. हा त्रास अवघ्या चार ते पाच दिवसांत कायमचा कसा कमी करायचा यासाठीचा हा खास उपाय...

डोकेदुखी आणि सिडीटीचा त्रास कायमचा कमी करण्यासाठी काय उपाय करता येईल याविषयीची माहिती आहारतज्ज्ञांनी thefoodideas या इन्स्टाग्राम पेजवर शेअर केली आहे.

यामध्ये त्या सांगतात की एका ग्लासमध्ये अर्ध्या लिंबाचा रस पिळा. यानंतर त्यामध्ये एक चिमूटभर काळे मीठ, चिमूटभर हिंग आणि एक टीस्पून मीरेपूड घाला. आता यामध्ये फक्त दोन चमचे गरम पाणी घालावं. पाण्याचं प्रमाण वाढवून ग्लासमधलं मिश्रण मुळीच डायल्यूट करू नका. आता सगळं पाणी व्यवस्थित हलवून घ्या आणि प्या.

जेवणाच्या अर्धा तास आधी या पद्धतीने पाणी प्या आणि त्यानंतर मध्ये काहीही न खाता थेट अर्ध्या तासाने जेवायला बसा. हा उपाय जर तुम्ही सलग पाच दिवस केला तर ॲसिडीटीचा आणि डोकेदुखीचा त्रास कमी होईल.

लिंबू, मीरेपूड, हिंग आणि काळे मीठ या पदार्थांमुळे पचनक्रिया व्यवस्थित होईल. त्यामुळे ॲसिडीटी तर होणार नाहीच, पण त्यासोबतच पोट फुगणे, गॅसेस होणे असे त्रासही होणार नाहीत असं आहारतज्ज्ञ सांगतात. करून बघा.

अशा प्रकारे डोकेदुखी आणि जोडूनच होणारी ॲसिडीटी दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय सांगितले आहेत. ते अवश्य करून पहा, मात्र तरीही समस्या सुटली नाही तर डॉक्टरांशी सल्लामसलत करावी.

# पेण क्रशर व खाण मालकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार –महसुलमंत्री

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खाणमालक व क्रशरधारक यांना गेल्या काही दिवसांपासुन शासकीय स्तरावर त्रास होत होता. शासकीय बाबी पूर्ण असताना स्वामित्व धनाची पूर्तता केली असताना सुध्दा खुप त्रास होत होता. लोन काढुन व्यवसाय करायचा अनेक प्रकारचे अडथळे पार करुन व्यवसाय करावा लागतो आहे. सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या असताना व्यवसाय



चालवणे जिकरीचे झालेल आहे.

याबाबत महायुतीचे रायगड खासदार सुनिल तटकरे यांनी महसुलमंत्री बावनकुळे यांची वेळ घेउन बैठक लावली महसुलमंत्री बावनकुळेंनी रायगड जिल्हाधिकारी यांना शासकीय बाबींची पूर्णता करुन सहकार्य करावे असे सांगितले.

पेण तालुका क्रशर व खाण मालकांनी खासदार सुनिल तटकरे. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांचे विशेष आभार मानले.

# अलिबागच्या बाधित खातेदारांना संमती करारपत्राचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शहापूर, ता.अलिबाग येथील भूखंड धारक मे.एपीपीसिनारमस कंपनी लि. यांना सध्याच्या PWD रस्त्यावरून तात्पुरता (WBM²) पोहच रस्ता देण्याकरिता संपादन होणाऱ्या क्षेत्राचे मोबदला देण्याचे काम उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात सुरू असून सर्व बाधित खातेदारांनी दि.२० जून २०२५ पर्यंत संमती करारपत्र दाखल करावे असे, आवाहन उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी केले आहे.

शहापूर, ता. अलिबाग येथील जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये संपादन होत आहे. ही जमीन शहापूर–धेरंड औद्योगिक क्षेत्र व धेरंड शहापूर औद्योगिक क्षेत्राकरिता पोहच रस्त्याकरिता मौजे शहापूर येथील एकूण २२.०८.३९ हे.आर. क्षेत्र संपादीत होत आहे. तसेच भूखंडधारक मे. एपीपीसिनारमस कंपनी लि. यांना सद्याच्या झथऊ रस्त्यावरून तात्पुरता (थइच्) पोहच रस्ता देणेकरिता मौजे शहापूर येथील एकूण २.९६.४० हे.आर. क्षेत्र संपादीत करण्यात येत आहे. मा. उच्चाधिकार समितीने दि.०७ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रति एकरी रूपये ९६,६९,५५४/– म्हणजेच र.रू. २,४१,७३,८८६/– प्रती हेक्टर एवढया दरास संमती दिलेली आहे.

त्या अनुषंगाने प्रकल्पामध्ये संपादन होणाऱ्या जमिनीतील बाधीत खातेदार यांना करारपत्राद्वारे रक्कम स्विकारणे कामी म.औ.वि. अधिनियम १९६१ मधील कलम ३३(३) अन्वये नोटीसा या कार्यालयामार्फत बजाविण्यात आल्या आहेत. यार नोटीसांना प्रतिसाद देऊन काही खातेदारांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयात संमती करार पत्र सादर केले आहेत. त्यानुसार संमती दिलेल्या खातेदारांची संपादीत होणाऱ्या क्षेत्राची मोबदला रक्कम आरटीजीएस/ एन.ई.एफ.टी. द्वारेखातेदारांच्या बँकखाती जमा करण्यात आली आहे. ज्या खातेदारांना मा.उच्चाधिकार समितीने मंजुरी दिलेला दरमान्य असेल त्यांनी आपले संमती करारपत्र उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर करावे.


## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खाली परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत त्याचे विद्दमान मालक / कब्जेदार यांचेकडून एकुण क्षेत्रापैकी ४० गुंठे जमीन मिळकत कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे – तामसई, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकर |
|---|---|---|
| २२/१/अ | ३.०३.७<br>पो. ख. १.०१.३०<br>**पैकी एकुण खरेदी करण्यात येणारे क्षेत्र– ४० गुंठे** | ६.८७ |

येणे प्रमाणे मिळकत आहे.

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीचा कोणत्याही ईसमाचा अगर संस्थेचा साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क लिज ऑफ पेन्डन्सी, लिज, टेनन्सी, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला–बदल, येणे–जाणेसाठी रस्ता, वहीवाट वगैरे व कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास किंवा त्यांच्या खरेदीखतास काही हरकत असल्यास सबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह प्रत्यक्षात लेखी किंवा पोष्टाने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावी. वरील मुदतीत कोणीही ईसमाने किंवा संस्थांनी हरकत न घेतल्यास कोणाही ईसमाचा किंवा संस्थांचा हक्क व हितसबंध नाही किंवा असल्यास तो माझ्या अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्याची माझ्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती हरकत माझ्या आशिलांवर बंधकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्थळ – पनवेल.**
**दिनांक–१२/०६/२०२५**

**सही /–**
**अॅड. गुरुनाथ दत्ता भगत**
**संपर्क क्र ८६९३८०२००५**



## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/विद्युत/फेर नि.सु/४७५/२०२५– २६ — दिनांक : १२–०६–२०२५

### फेर जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या विद्युत विभागास खालिल नमुद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून फेर निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या इमारतींमधिल बातानिकुलित यंत्रणा व वॉटर कुलर विथ प्युरिफायर यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत |
| २. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेस विद्युत साहित्य पुरवठा करणे. | १०००० | १००० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ३. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या नदी संवर्धन गार्डन मधील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ४. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राऊन्ड (क्षेपण भुमी) येथील वार्षिक विद्युत देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |
| ५. | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दरमंजूर होईपर्यंत रोहा नगर परिषदेच्या मालकिच्या ७.५ के.व्ही.ए, ४० के.व्ही.ए, २५० के.व्ही.ए. १५ के.व्ही.ए. जनरेटर्स यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | सन २०२५–२६ व त्यापुढील वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत |

**निविदा अटी/शर्ती :–**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १३–०६–२०२५ पासून २४–०६–२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.
२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक १३–०६–२०२५ पासून २४–०६–२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.
३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोट्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक १३–०६–२०२५ पासून २४–०६–२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.
४) निविदेतील दर हे जी.एस.टी. वगळून इतर करांसहित असावेत. बिलाची आकारणी करतेवेळी जी.एस.टी. अनुज्ञेय राहील.
५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक २४–०६–२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल
६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.
७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.
८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

**सही/–**
**( अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**



## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड,

**शिक्षण विभाग, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल– ४१० २०६.**

Email: msbpanvel1993@gmail.com — Emai: panvelcorporation@gmail.com

### अंदाजपत्र बनविणेकामी दरपत्रक

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | दरपत्रक/पमपा/शिक्षण/२०२५ | पनवेल महानगरपालिकेतील पूर्व माध्यमिक शाळेतील इ.६वी ते ८वीतील विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर सुधारणा उपक्रम राबविणेबाबत |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि.१३/०६/२०२५ ते दि. २०/०६/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग (लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, ) येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात प्राप्त होईल याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. २५४/२५६/२०२५**
**दिनांक :– १२/०६/२०२५**

**सही/–**
**शिक्षणाधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहिर निविदा
### ग्रामपंचायत माडप
### ता. खालापुर, जि. रायगड

सर्व बांधकाम ठेकेदार व पुरवठादार यांस जाहिर निविदाद्वारे कळविण्यात येते की, ग्राम पंचायत माडप ता.खालापुर, जि. रायगड यांजकडुन ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी कामाच्या अनुभविक इच्छुक जी.एस.टी. धारक ठेकेदारांकडुन व पुरवठा धारकांकडुन लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत व पुरवठाधारकांनी ज्या वस्तु पुरवायचे आहेत त्यांनी आपली निविदा दि.१३/०६/२०२५ पासुन दि.२०/०६/२०२५ पर्यंत सकाळी ठिक १०.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि.२०/०६/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. मा. सरपंच व सदस्य व ठेकेदार/पुरवठादार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा आधिकार मा. सरपंच यांनी राखुन ठेवलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्या खरेदी करणे. | ९८,७८०/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २०२५-२०२६ | - | **६ महिने** |
| २. | आईला रोपे वाटप करणे. | ४०,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २०२५-२०२६ | - | **६ महिने** |
| ३. | मुठा ठाकुरवाडी प्राथमिक शाळा छप्पर व इतर दुरुस्ती करणे | ५०,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ५००/- | **६ महिने** |
| ४. | माडप बसस्टॉप ते ग्रा.पं. कार्यालय पर्यंत व माडप कातकरीवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याचे खड्डे भरणे. | ३,००,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ३०००/- | **६ महिने** |
| ५. | ग्रामपंचायत माडप हद्दीतील रस्ते व गटारे साफसफाई करणे. व झाडे झुडपे तोडणे. | १,००,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | १०००/- | **६ महिने** |
| ६. | कापडी पिशव्या खरेदी करणे. | ९८,५००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | - | **६ महिने** |
| ७. | रोपे खरेदी करुन वाटप करणे. | ५०,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | - | **६ महिने** |
| ८. | ग्रामपंचायत हद्दीतील गटार दुरुस्ती करणे. | ३,००,०००/- | ग्रामनिधी २०२५-२०२६ | ३०००/- | **६ महिने** |

अटी शर्ती :–
१. सदर कामाची कोरी निविदा दिनांक १३/०६/२०२५ ते २०/०६/२०२५ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदे सोबत एक टक्का इसारा रक्कम रोखीने ग्रामंपचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी,
३. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु. च्या बाँड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबधित तांत्रिक आधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखेखाली पुर्ण करण्याचे आहे.
५. काम पूर्ण झाल्यावर कामाच्या बिलातुन ५ टक्के सुरक्षा अनामत, २ जी.एस.टी., २ टक्के आयकर, १ टक्का कामगार कल्याण, १ टक्का कामगार विमा इत्यादी रकमा कपात केल्या जातील,
६. ठेकेदार हा अनुभवी व GST धारक असावा.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहुन ६ महिन्याने परत केली जाईल,
८. कामाचे वेळी काही जीवीतहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत माडप**
**ता.खालापुर, जि. रायगड**

**सही/–**
**सरपंच**
**ग्राम पंचायत माडप**
**ता.खालापुर, जि. रायगड**



## पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता –नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र–४००७०४

**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-**400704**

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स–022-27222132, | ई–मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट – https://nadkaranja.kvs.ac.in — ईमेल: kvkaranja@gmail.com

### साक्षात्कार सूचना /Walk-In Interview
### दिनांक : 19.06.2025 (गुरुवार)

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शौक्षिक वर्ष 2025-26 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शौक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers)<br>**भौतिक विज्ञान**/PHYSICS | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक** (Trained Graduate Teacher)<br>**संस्कृत** / SANSKRIT | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी.ए) एवं बी.एड डिग्री |
| **प्राथमिक शिक्षक** (PRIMARY TEACHER) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से सम्बंधित विषय में ५०% अंकों के साथ १२वीं पास एवं डी.एड. डिग्री और सी.टी.ई.टी |
| **प्रशिक्षक :**<br>Skill Educator<br>Vocational Educator (Computer) | सम्बंधित विषय में डिग्री |

**साक्षात्कार दिवस :** 19.06.2025 **(गुरुवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/–**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**पीएम श्री केंन्द्रीय विद्यालय/ PM SHRI Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**
**उरण जिला–रायगढ़ (महाराष्ट्र)/ Uran Dist.-Raigad (MH)**

# सायबर पोलिसांकडून गुन्ह्यांची उकल

## चार संशयित आरोपी अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सायबर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांत चार जणांना अटक केली आहे. बात आयपीओद्वारा भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून तर दुसऱ्या प्रकरणात फिर्यादी यांना कंपनीचे संचालक असल्याचे भासवून फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्यात एका महिलेचा समावेश असून तिच्यासह एका साथीदाराला अटक करण्यात आली.



नवी मुंबईत राहणारे फिर्यादी हे एका कंपनीत काम करीत असून कंपनीच्या पैशांचे व्यवहार त्यांच्या हातून केले जात होते. याचा गैरफायदा घेत दोन व्यक्तींनी ते फिर्यादी काम करीत असलेल्या कंपनीचे संचालक आहेत अशी बाप मारून १८ मे ते १९ मे दरम्यान कंपनीच्या खात्यातून तब्बल ७५ लाख स्वतःच्या खात्यात वळवले.

याप्रकरणी शाबाज आरीफ अन्सारी, याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून अन्य साथीदार बिलकिस नसीम मोमीन हिचे नाव समोर आले. दोघांनाही सहा तारखेला अटक केली असून त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी फर्माविण्यात आली आहे. दुसऱ्या गुन्हयामध्ये आयपीओ आणि इंडेक्स ट्रेडिंगमध्ये भरघोस परताव्याचे आमिष दाखवून चार कोटी ७१ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. यामध्ये प्रकाश गव्हाणे आणि मनोज कालापाड, यांची नावे समोर आली.

# रसायनीत मुलाचे अपहरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दुर्गामाता कॉलनी चांभार्ली येथील विजय कैलास तायडे यांचा चुलत भाऊ सुमित संजय तायडे या मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली आहे.

बेपत्ता सुमित (वय १७ वर्ष १० महिने) रंगाने सावळा, चेहरा गोल, उंची पाच फुट पाच इंच अंदाजे, अंगाने सडपातळ, अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट अशा वर्णनाचा मुलाचे अपहरण झाले असून तो पेंटर रवि संतोष कुमार यांच्यासोबत इस्पात कंपनी येथे पेंटींग काम करण्यास गेला होता. त्यानंतर कामावरून परत येते वेळेस पेंटर रवि संतोष कुमार याने सिद्धेश्वरी कॉर्नर येथे सुमित यास रिक्षात बसवून दिले. त्यानंतर तो घरी पोहचला नाही.



तेव्हा यांचे लक्षात आले की सुमितच्या अज्ञानपणाचा फायदा घेउन कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले आहे.

यासाठी तायडे कुटूंबाने नातेवाईक व गावात इतरत्र शोधही घेतला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात बीएनएस १३७(२)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे, पोलीस नाईक सौ. पाटील अधिक तपास करीत आहेत.

# चिरनेर येथे कृषी शास्त्रज्ञांकडून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कृषी पूरक उद्योगांची जोड देत, शेती पद्धतीचा अवलंब करावा असा सल्ला प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सनद कुमार यांनी दिला. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, कृषी विज्ञान केंद्र रायगड, महाराष्ट्र विकसित कृषी संकल्प अभियाना मार्फत चिरनेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात ११ जून रोजी शेतकऱ्यांसाठी कृषी शास्त्रज्ञांचे आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कृषी शास्त्रज्ञांनी शेतीला आधुनिक स्वयंपूर्ण बनवणे हे या अभियानाचे उद्दिष्ट असून, शेतीत नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगूनच शेतकऱ्यांनी शेती करावी, असे आवाहन उपस्थित शेतकऱ्यांना केले.

आधुनिक काळात केमिकलचा वापर वाढला आहे, मात्र याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. त्यामुळे पिकांना आवश्यक पोषक अन्नद्रव्य द्यावीत, जिवाणू मारू नका. गांडूळ आता दिसत नाही. हिरवळीची खते वापरा. युरियाचा वापर प्रमाणातच करावा. पाणी प्रमाणात कसे वापरावे, यासाठी तंत्रज्ञान आहे. पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी पर्यावरणीय समतोल आणि भुजल स्तोत्रांचे बळकटीकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे शास्त्रज्ञ डॉ. सचिन कार्ले यांनी सांगितले.



या वेळी शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद माउंवकर यांनी शेतकऱ्यांना विकसित व शिफारस केलेल्या विविध भात बियाणांची वैशिष्ट्यपूर्ण माहिती दिली. याशिवाय अशीच बियाणी लागवडीखाली आणावी असे त्यांनी आवाहन करीत, माती परीक्षणाच्या नमुन्यांची देखील वैशिष्ट्यपूर्ण माहिती यावेळी त्यांनी दिली. खोड किड्यासाठी खोलगट नांगरणी, पुरेसा ओलावा, कीटकनाशक फवारणी, व रोगाला बळी पडू नये म्हणून रोपांच्या मुळांना औषध फवारणी करावी. असा शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर यांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला. तर शास्त्रज्ञ डॉ. रामटेके यांनी तरुणांनी शेतीकडे वळले पाहिजे तरच आपले भवितव्य चांगले राहील असे सांगून, शेतीला निगडित शासनाच्या विविध योजनांचा उहापोह त्यांनी यावेळी केला. तसेच पारंपारिक बियाणे कालबाह्य झाली आहेत. त्यामुळे पोषणमूल्य असलेल्या भातजाती व बीजोत्पादनाची माहितीही त्यांनी या वेळी दिली. शाश्वत उत्पादन घेण्यासाठी येथील हवामान फळबाग लागवडीसाठी अनकुल आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, फणस, आवळा, चिकू, जांभूळ, चिंच यासारख्या फळ पिकांची लागवड करावी, असे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले.

या वेळी व्यासपीठावर महाराष्ट्र शासन शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, संजय पाटील, कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषी पर्यवेक्षक अलका बरकुल, बीटीएम नमिता वाकळे, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड, शेतकरी बळीराम म्हात्रे, महेंद्र मोकल, अनिल केणी, भास्कर ठाकूर तसेच चिरनेरचे अन्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

# धोकादायक इमारतींवर पालिकेची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सी विभाग वाशी कार्यक्षेत्रातील सी–१ (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्काषित करणे) या प्रवर्गात घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आदेशान्वये व उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये यांची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने वाशी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या नियंत्रणाखाली तीन अतिधोकादायक इमारतींचा पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व मलनि:स्सारण वाहिनी खंडीत करण्यात आलेली आहे.

या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग व मलनि:स्सारण विभाग यांचे अधिकारी/कर्मचारी, स्थानिक पोलिस स्टेशनचे कर्मचारी व अतिक्रमण विभागाचे पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

सध्या पावसाळा सुरु झाला असून नमुंमपा कार्यक्षेत्रातील इतर अतिधोकादायक इमारतींमध्ये रहिवास करणाऱ्या नागरिकांनी रहिवास वापर थांबवून इमारतीखाली करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. यापुढील काळात अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

जय महाराष्ट्र सोसा., जे एन–२ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, भु.क्र.४, से–०९, वाशी, लिटिल फ्लॉवर को.ऑप.हौ. सो. लि., जेएन–४ टाईप (बिल्डिंग नं. ९) से.९, वाशी, सी १ व सी २ टाईप, बिल्डींग नं–१ ते १२, सेक्टर–०२, वाशी. या तीन इमारतींचा समावेश आहे.

# उरण ते मंत्रालय एनएमएमटी बस सुरू करण्याची मागणी

**उरण : बातमीदार**

औद्योगिक दृष्ट्या उरण तालुका झपाट्याने विकसित होत असून उरण मधून बाहेर व बाहेरून उरणमध्ये येणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे, मात्र वेगाने विकास होणाऱ्या उरण तालुक्यात प्रवासाच्या बाबतीत योग्य ते सोयी सुविधा नसल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. उरणमधून जास्तीत जास्त प्रवाशासाठी वाहने उपलब्ध करून देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण ते मंत्रालय बस सुरु करण्याची मागणी उरण आलाईव्ह ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. अटलसेतु सागरी महामार्गामुळे उरण आणि मुंबई मधील अंतर कमी झाले आहे. त्यामुळे नेरुळ ते मंत्रालय प्रमाणे उरण ते मंत्रालय या मार्गावरही एनएमएमटी बस सेवा सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे 'उरण आलाईव्ह ग्रुप' यांच्या वतीने करण्यात आली आहे. ज्यामुळे उरणकरांना मंत्रालयाशी थेट संपर्क करण्यास सोपे जाणार आहे. तर या मार्गीकेमुळे मुंबईच्या इतर भागात जाणेही सोईचे होणार आहे.

नवी मुंबईला लागून असलेला उरण तालुक्यात अनेक मोठ मोठे प्रकल्प, कंपन्या आहेत. त्यामुळे येथे प्रवाशी मोठया प्रमाणात प्रवास करत असतात. उरण मधील नागरिक नोकरी व्यवसाय धंदा निमित्त उरण तालुक्यात तसेच उरण तालुक्या बाहेर मोठया प्रमाणात जातात. उरण परिसर हा नवी मुंबईच्या विकासाचा एक भाग आहे. तर मुंबई येथील मंत्रालय आणि दक्षिण मुंबईत दररोज प्रवास करणाऱ्या प्रवासांची संख्या मोठी आहे. उरण ते मुंबई प्रवासाकरिता मोरा–मुंबई व जेएनपीए–मुंबई अशा दोन जलसेवा



आहेत, मात्र या जलसेवा अनेकदा खंडित होण्याच्या घटना बळावल्या आहेत. याचा त्रास नित्यनेमाने मुंबई प्रवास करणाऱ्या प्रवाशांना करावा लागत आहे. तर दुसरीकडे नेरुळ ते मंत्रालय दरम्यानच्या सेवेचा लाभ उरण मधील प्रवासी उलवे येथे जाऊन घेत आहेत. यामुळे मंत्रालय सेवेचा लाभ घ्यायचा असल्यास उरणच्या प्रवाशांना उलवे येथे जावे लागते.

अटलसेतु हा उरणला जोडणारा असल्याने या महामार्गावरून उरण ते मंत्रालय दरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेची एनएमएमटी बस सेवा सुरू करण्याची मागणी 'उरण आलाईव्ह ग्रुप' कडून करण्यात आली आहे. यामुळे, उरण मधील नागरिकांना कमी वेळात मुंबई गाठता येऊ शकते.

एनएमएमटीने नेरूळ ते उलवे नोड मार्गे मंत्रालय अशी बस सेवा सुरू केली आहे. अशाच प्रकारे उरण ते मुंबई (सीएसटी, मंत्रालय) पर्यंत जाणारी बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदन नवीमुंबई महानगर पालीका परिवहन सेवेचे व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांना देण्यात आले आहे. उरण ते मंत्रालय या मार्गावर लवकरच बस सेवा सुरू होईल, अशी आशा नागरिकांना आहे.



**पनवेल : नवीन पनवेलमधील मेघना प्रदीप देशमुख ही अमेरीकेला पायलटचे ट्रेनिंग घेण्यासाठी जाणार आहे. त्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. या मदतीचा धनादेश भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख यांच्या हस्ते गुरुवारी देण्यात आला असून त्यांनी मेघनाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी मेघनाचे वडील प्रदीप देशमुख उपस्थित होते.**

# शैक्षणिक साहित्य वाटप करून शिवराज्याभिषेक दिन साजरा

**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठान आणि शिव प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या वतीने राज्यभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून मुकरीची वाडी आणि लालवाडी करंजाडेमध्ये शालेपयोगी किटचे वाटप करण्यात आले.

या मध्ये प्रामुख्याने मुलांना बॅग वह्या पेन पेन्सिल कंपास पेटी अश्या वस्तूंचे वाटत करण्यात आले. वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास महिला मंडळ पदाधिकारी सुषमा मयेकर, ज्योती टोटरे, प्रियांका ठाकूर, शिव



प्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील, उपाध्यक्ष प्रशांत निर्मळ, संदीप पाटील, मनीष कटेकर, राकेश कुसले, सुनील अंबावडे, अविनाश ठोसर, प्रशांत शेट्टी, सुरेश बार्वे, अमर कुसळे,अमर सावंत, अक्षय मोरे, सिद्धार्थ अंबावडे, समीर कांबळे, राजेश शेलार आदी उपस्थित होते.

शिव प्रतिष्ठान आणि शिव प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप करून शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आल्याने या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्हा संघटकपदी महेंद्र पाटील

**उरण : बातमीदार**

शिवसेनेच्या उरण विधानसभा क्षेत्रात आपल्या ठाम आणि परिणामकारक कार्यशैलीने पक्षवाढीसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या महेंद्र मोरेश्वर पाटील यांची शिवसेना पक्षाच्या रायगड जिल्हा संघटकपदी कार्यक्षेत्र उरणमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत असलेल्या शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदेंनी या नियुक्तीस मान्यता दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा स्तरावर प्रभावी नेतृत्व करणारे महासंसद रत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे, कॅबिनेट मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी तसेच महाराष्ट्र सचिव संजय मोरे या मान्यवरांनी महेंद्र पाटील यांच्या कार्यक्षमतेची आणि निष्ठेची पोचपावती दिली आहे.



महेंद्र पाटील यांनी उरण तालुक्यातील खोपटे पाटीलपाडा येथून कार्याची सुरुवात करून, उरण पूर्व विभागप्रमुख पदानंतर उरण तालुकाप्रमुख पदाने संपूर्ण उरण विधानसभा क्षेत्रात शिवसेना पक्षाच्या विचारांची मुहूर्तमेढ रोवली आहे. पक्षाच्या प्रत्येक निर्णयामध्ये ते सक्रियपणे सहभागी राहिले आहेत.

# ऐरोलीत होणार नमोस्तुतेचे पर्व तिसरे

## १०० वादक साकारणार अविष्कार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नादवेणू संगीत अकादमीच्यावतीने नमोस्तुते पर्व ३ रे या कार्यक्रमाचे आयोजन येत्या १४ जुन रोजी ऐरोली येथे करण्यात आले आहे. बासरी वादक पंडित विवेक सोनार आणि पंडित सत्यजित तळवळकर यांच्यातील जुगलबंदीचे सादरीकरण यावर्षीच्या नादवेणूचे विशेष आकर्षण असणार आहे.

तसेच ५ ते ७५ वय वर्षापर्यंतचे तब्बल ७० बासरी वादक आणि३० हार्मोनियम वादक विविध चित्रपट गीत, लोकगीत आणि शास्त्रीय संगीतातील राग याप्रसंगी सादर करणार आहेत. सदर कार्यक्रम १४जून रोजी सायंकाळी ६वा. ऐरोली सेक्टर–५ येथील जानकीबाई मढवी हॉल येथे होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील नादवेणू तर्फे पंडित विवेक सोनार यांच्या नावाने काही विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार असल्याचे आयोजक आकाश सुर्यवंशी यांनी सांगितले.

नमोस्तुते पर्व तिरे या अविस्मरणीय कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी नादवेणू तर्फे समस्त रसिक प्रेक्षकांना आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आकाश सोनी (७४००२९६८६७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनिल नारंगीकर यांना सेवानिरोप

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील गरिबीतून पुढे आलेले सुपुत्र अनिल नारायण नारंगीकर हे ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून, सहाय्यक गटविकास अधिकारी सनियंत्रण अधिकारी या पदावरून राज्य व्यवस्थापन कक्ष महाराष्ट्र राज्य बेलापूर येथून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी सेवेत दिलेल्या योगदानाबद्दल त्यांच्या कुटुंबीयांतर्फे व ग्रामस्थांमार्फत सेवानिवृत्ती सत्कार सोहळा चिरनेर येथील मानसी फार्म हाऊस येथे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी सुरेश पाटील, संजय पाटील, शैलेश तांडेल, अलंकार परदेशी, प्रेमनाथ ठाकूर, सुरेश शेडगे, समाधान ठाकूर, पद्माकर फोफेरकर, श्री ठोंबरे, श्री पालव, श्री दांडेकर, प्रकाश म्हात्रे, तुकाराम म्हात्रे जयहिंद म्हात्रे, प्रकाश नारंगीकर, निलेश म्हात्रे, बापू मोकल, मंजुळा म्हात्रे, उषा म्हात्रे, मधुकर फोफेरकर, अश्विन नारंगीकर, चिरायू म्हात्रे, हर्षदा म्हात्रे, जीवन गावंड, शशी देशमुख, सुभाष वाणी, शशिकांत सुतार, सुनील पाटील, श्री नलावडे, श्री मोहिते, नारायण केणी, मोरेश्वर मोकल, शशिकांत ठाकूर, निलेश म्हस्कर, रमेश तारेकर, गुरुप्रसाद म्हात्रे, प्रवीण कडू, श्री राठोड, जी. जी. म्हात्रे आदीजण उपस्थित होते.





**उरण : भाजप ग्रामीण संपर्क प्रमुख रवी भोईर यांचा वाढदिवस आमदार महेश बालदी संपर्क कार्यलयात साजरा करण्यात आला. या वेळी तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, खोपटे सरपंच विशाखा ठाकूर, चिटणीस निशा म्हात्रे, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, प्रसाद भोईर, निखील माळी, सारडे ग्रामपंचायत सरपंच रोशन पाटील, भाजप उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, करण ठाकूर, गणेश गावंड आदी उपस्थित होते.**

# श्रीवर्धन तालुक्यात पर्यटनाच्या विकासाला मिळणार चालना





**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील पर्यटनाच्या वाढीस चालना देत रोजगार निर्मितीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, दिवेआगर आणि श्रीवर्धनच्या एकत्रित पर्यटन विकास आराखड्याची समीक्षा करण्यात आली. या बैठकीत कोकणातील पर्यटनवाढीसाठी निर्णायक निर्णय घेण्यात आले.

हरिहरेश्वर प्रदक्षिणा मार्गाच्या विकासासाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.मारळ येथे अवकाश निरीक्षण (Star Gazing) प्रकल्प राबविण्यासाठी लागणाऱ्या निधीस पूरक मागण्यांद्वारे मंजुरी देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. दिवेआगर येथील मत्सालय प्रकल्पासाठी 'स्वदेश दर्शन' योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडे ६९ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर हे क्षेत्र पर्यटनाच्या नकाशावर नवे शिखर गाठतील, स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील आणि कोकणच्या समृद्ध सांस्कृतिक-धार्मिक वारशाला नवे आयाम मिळतील.

या ऐतिहासिक बैठकीत खासदार सुनिल तटकरे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने, सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि प्रभावी नेतृत्वाने या भागातील पर्यटन प्रकल्पांना मूर्त स्वरूप देण्यास मोठा वाटा उचलला आहे. कोकणच्या विकासासाठी सदैव तत्पर असलेल्या तटकरे साहेबांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की तेच या भागाच्या विकासाचे महामेरू आहेत.

या बैठकीस राज्याचे पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, वित्त विभागाचे अधिकारी राजगोपाल देवरा यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या सर्वांच्या समन्वित प्रयत्नांमुळे कोकणातील पर्यटनाच्या विकासाला गती मिळणार आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपीचा शोध

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी या गावी एका नराधमाने अल्पवयीन मुलीच्या असाह्यतेचा फायदा घेत, लैंगिक अत्याचार करून छळ केल्याची घटना घडली असून. याप्रकरणी महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.




याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलीस यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी स्वराज तांबे वय वर्ष २१ राहणार कीये, तालुका महाड याने माहे जुलै २०२२ रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास मौजे आदर्श नगर बिरवाडी येथील आरोपीच्या बहिणीच्या घरात सदर अल्पवयीन मुलीला नेऊन तिच्या असह्यतेचा गैरफायदा घेत तिच्यावरती लैंगिक अत्याचार केला.

तसेच दिनांक ११ जून २०२५ रोजी मोटरसायकलने जबरन महाड रायगड रोडवरील एका अज्ञात गावात नेऊन सदर पीडित मुलीला मारहाण करून तिच्या अंगावरील कपडे जबरदस्तीने फाडून शरीर संबंध करण्याचा प्रयत्न करून, स्वतः च्या मोबाईल मध्ये त्याचे अश्लील चित्रीकरण करून तू माझ्यासोबत कशी राहत नाहीस तेच बघतो अन्यथा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केल्याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी हा फरार झाला असून पोलीस या आरोपीचे व त्यांच्यासोबत त्याला सहकार्य करणाऱ्या सह आरोपींच्या शोध घेत असून आरोपीची बहीण व त्याचा भाऊजी यांना अटक करण्यात आले असल्याची माहिती महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी दिली आहे.

याप्रकरणी आरोपी स्वराज तांबे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७(२), ६५ (१), ३५२, ३५१ (२), ११५(२), बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२, १७, १४ (२), माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७ ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास महाड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे करीत आहेत.

# 'सुदर्शन'च्या सहाय्याने ग्रामीण भागातील महिला स्वावलंबी



**रोहे : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविण्याचा एक उल्लेखनीय प्रकल्प हाती घेतला आहे. सुदर्शन सीएसआर फाऊंडेशनने रोहा धाटाव–बारसोली (सुंदरनगर) येथे युनिफॉर्म स्टिचिंग सेंटर विकसित करून ग्रामीण भागातील गरजू महिलांना रोजगाराची नवीन संधी निर्माण केली आहे. या स्टिचिंग सेंटरच्या माध्यमातून रोहा विभागातील होतकरू महिलांना प्रशिक्षित करून त्यांना आर्थिकवृद्धी देण्यासाठी सुदर्शनकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

या प्रकल्पाच्या पहिल्याच टप्प्यात कंपनीतील कर्मचारी वर्गाच्या १५०० युनिफॉर्म्सची ऑर्डर कंपनीनेच दिल्याने महिलांना प्रोत्साहन व नवा आत्मविश्वास मिळाला आहे. सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सीएसआर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनखाली महिलांमध्ये कौशल्य विकासित करणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे या उद्देशातून हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याअनुषंगाने युनिफॉर्म स्टिचिंगचे प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना आता शासकीय, खाजगी संस्था आणि औद्योगिक विभागातील युनिफॉर्म्सची मागणी पूर्ण करता येईल.

युनिफॉर्म स्टिचींग सेंटरचे उद्घाटन सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड रोहाचे साईट हेड विवेक गर्ग यांच्या हस्ते करण्यात आले. सुदर्शन व्यवस्थापन आपल्या विविध सीएसआर उपक्रमांतून रोहा विभागात सामाजिक विकास करणेसाठी कायमच कटीबद्ध राहिलेली आहे. तसेच या प्रकल्पामध्ये महिलांनी दाखवलेला सहभाग आणि समर्पण प्रेरणादायी आहे, असे मत विवेक गर्ग यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी सहभागी महिलांना दर्जात्मक कामासाठी मार्गदर्शनही केले.

सुदर्शनचे अधिकारी शिवदास बनकर म्हणाले की, हा प्रकल्प केवळ रोजगार निर्मितीपुरता मर्यादित नसून, ग्रामीण महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे साधन बनला आहे. स्थानिक पातळीवर उद्योजकता वाढविणे आणि रोजगार निर्मितीसाठी सुदर्शन सीएसआर फाऊंडेशन असे अभिनव उपक्रम राबवित आहे.

यावेळी सुदर्शनने उपलब्ध करून दिलेल्या या उपक्रमासाठी उपस्थित महिलांनी सुदर्शन व्यवस्थापन, सीएसआर फौंडेशनचे आभार मानले. त्याचप्रमाणे आम्ही हा उपक्रम यशस्वी करून दाखवूच असा विश्वास कंपनी व्यवस्थापनास दिला. तसेच या रोजगारातून आम्हाला आता कुटुंबास आर्थिक हातभार देता येईल याचे आम्हाला खुप समाधान होत आहे, असे मत उपस्थित महिलांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी गणेश बांभुरकर, संतोष मोढवे, ॲड. विशाल घोरपडे, पराग फुकणे, श्याम धुसाने, रवि दिघे, महेश डेरीया, स्वाती मोहिते, समीर वाडवळ, अमर चांदणे आदी उपस्थित होते.

# काय तो इथला पाऊस....काय ती थंड हवा....काय ते धबधबे....

## वर्षा सहलीसाठी माथेरान पर्यटनस्थळ बेस्ट

**माथेरान : बातमीदार**

यंदाच्या वर्षी पावसाचे आगमन लवकर झाले असून अवघ्या काही दिवसांत पावसाळा सुरू होणार आहे. आता उन्हाचे चटके देणारे दिवस संपून सुखद गारव्यांच्या दिवसांना सुरवात होईल. अनेकांना उन्हाळ्यात कामाच्या, व्यवसायाच्या दगदगीतून उसंत मिळत नाही त्यामुळे निदान पावसाळ्यात तरी वेळात वेळ काढून मनाला आलेली मरगळ, शिणटा घालवण्यासाठी अगदी जवळचेच रमणीय पर्यटनस्थळ म्हणून माथेरानला पर्यटनस्थळाला अधिकाधिक पसंती दिली जाते.काय तो इथला पाऊस......काय ती थंड हवा......काय ते धबधबे...... असे म्हणत निसर्गप्रेमी पर्यटक वर्षा ऋतूत आपला मोर्चा माथेरान पर्यटनस्थळी वळवताना दिसणार आहेत.



जिल्ह्यातील अनेक धबधब्यांवर मद्यधुंद युवकांचा गदारोळ सर्रासपणे पहावयास मिळतो. पावसाळ्यामध्ये अनेक नदी नाल्यांवर दारूच्या नशेमध्ये अतिउत्साही तरुणांना पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे बुडून मरणाऱ्यांच्या घटना घडत असतात. या घटनांना आळा बसविण्यासाठी पोलीस प्रशासनाने अनेक ठिकाणी बंदी घातली आहे.त्यामुळे आपले निसर्गप्रेम वर्षाऋतूत पण अबाधित ठेवण्यासाठी बहुसंख्य पर्यटक हे माथेरान पर्यटनस्थळाला आपली पहिली पसंती देतात.आता

माथेरानमध्ये जरी धबधबे नसले तरी सुद्धा पायी चालत येताना घाट रस्त्यात लागणाऱ्या धबधब्यांवर मनसोक्तपणे भिजण्याचा आनंद घेणारे युवा निसर्गप्रेमी नियमितपणे माथेरान पर्यटनस्थळी येत असतात.माथेरान शहरात दाखल झाल्यावर येथील पावसाच्या गारेगार पाण्यात पदभ्रमण करताना भिजण्याचा जो नैसर्गिक आनंद मिळतो तो तर अगदी विरळाच असतो.आणि भिजत भिजत पॉईंट वरील निसर्गरम्य स्थळे न्याहाळत असताना दाट धुक्यातून समोरची अलौकिक,अदभुत व अवर्णनीय दृश्ये डोळ्यात साठवून आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी सुद्धा पर्यटकांची एकप्रकारे धांदल उडत असते.काही जवळच्या पॉईंटवर गारव्यात गरमागरम मका खाण्याची मजा तर काही औरच असते.



वाफाळलेला चहा व गरमागरम कांदा भजीचा आस्वाद मनाला ताजेतवाने बनवतो.त्याच बरोबर केवळ धबधब्याखाली अंघोळ करण्याची हौस देखील येथील सुंदर शारलोट तलावाच्या ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली तृप्त होत असते.त्यामुळे तर अनेकजण हे निसर्गाच्या कुशीतील गर्द वनराई मध्ये विसावलेल्या शारलोट तलावाला आवर्जून भेट देतात.हे अप्रतिम सुंदर नैसर्गिक दृश्यांनी वेढलेले हे छोटेसे हिल स्टेशन पावसाळ्यात पर्यटकांना आकर्षित करते.येथील खोल दऱ्या,वाहणारे धबधबे आणि स्वच्छ हवा पर्यटकांना पुन्हा पुन्हा येथे येण्याचे आमंत्रण देतात.माथेरान पर्यटनस्थळी वर्षभर पर्यटक येत असतात पण मात्र पावसाळ्यात या हिल स्टेशनवर जणू हिरवाईची चादरच पांघरलेली असते.

पावसाळ्यात येथील सगळा परिसर धुक्यात लपला जातो ज्यामुळे त्याचे सौंदर्य अनेक पटीने वाढते.येथील एको पॉईंट,लुईझा पॉईंट,वन ट्री हिल पॉईंटलिटिल चौक पॉईंट,अलेक्झांडर पॉईंट,रामबाग पॉईंट आणि शारलोट तलावयेथे पावसाळ्यात हमखास पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते.पावसाळ्यात सुद्धा घोड्यावरून रपेट मारणे आणि हातरीक्षा मधून सफर करण्याची संधी सहसा कोणी हुकवत नाहीत.त्यामुळे आता यंदाच्या वर्षी लवकर सुरू होत पावसाळ्यातील वर्षा सहलीसाठी माथेरान पर्यटनस्थळ हे बेस्ट असल्याचे बोलले जाते.येथे एकदा आल्यावर पुन्हा येण्यासाठी मन आतुरलेले असते असे खुद्द पर्यटकच सांगतात.

**माथेरानला कसे जाल**

***मुंबई पुण्याहुन नेरळ स्टेशन येथे उतरल्यावर मोटारीने माथेरान प्रवेशद्वारा जवळ आल्यास तेथूनच हाकेच्या अंतरावर अमन लॉज स्टेशन आहे. तेथूनच माथेरान मुख्य बाजारपेठेत येण्यासाठी मध्ये रेल्वेची शटल सेवा स्वस्त दरातउपलब्ध आहे.तसेच घोडे,हातरीक्षा आणि आता नव्याने सुरू झालेल्या ई-रिक्षा सेवा देखील उपलब्ध आहेत***

# दहावीचे वर्ग मित्र, आले ३४ वर्षांनी एकत्र

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विघवली हायस्कूलच्या सन-१९९१ च्या इयत्ता १० वी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रिव्हरलॅंड रिसॉर्ट माणगाव येथे दि.८ जून २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सन १९९१ साली बाहेर पडलेले हे सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा तब्बल ३४ वर्षाने एकत्र आले. ८ जून हा जागतिक मैत्रीदिन असल्यामुळे तोही एक दुग्धशर्करा योग जुळून आला. तब्बल ३४ वर्षाने भेटत असल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत असल्याचे दिसत होते. या स्नेह मेळाव्यासाठी ४५ पैकी ३५ विद्यार्थी हजर होते. विघवली हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक मोहिते व शिक्षिका सुरेखा दांडेकर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमतः स्वरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रगीत व प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर गुरुजनांचे व सर्व मित्र - मैत्रिणीचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. त्यावेळी प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले. मनोगत व्यक्त करताना हा मैत्रीचा धागा असाच घट्ट धरून ठेवूया असे सांगताना माजी विद्यार्थी भावुक झाले.

मुख्याध्यापक मोहिते यांनी मनोगत व्यक्त करताना भावुक होवून म्हणाले की, हा पहिला स्नेह मेळावा असा आहे जिथे आम्हाला आमच्या माजी विद्यार्थ्यांनी बोलविले. सुरेखा दांडेकर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या कि तुम्ही असेच स्नेहमेळावे करत रहा आणि जीवनाचा आनंद घेत रहा असे म्हणून सर्वाना पूढील आयुष्यासाठी शुभेच्या दिल्या.

त्यानंतर सर्वानी लगोरी, संगीतखुर्ची, तळ्यातमळ्यात ,स्विमिंग, स्नेहभोजन आशा विविध गोष्टींचा आस्वाद घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला. एकमेकांबरोबर कधीही न बोललेली मुलं आणि मुली आज मात्र लहान होवून मोकळेपणाने पुन्हा तेच दिवस जगत होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुवदन सापळे, रंजना म्हात्रे, शंकर उभारे, निशांत साठे,मंगेश जाधव, नथुराम मुंडे, शुभांगी जाधव, जगदीश जाधव आणि मंगेश सुतार यांनी परिश्रम घेतले. केवळ एका आठवड्यात सर्व प्रकारचे नियोजन करून वयाच्या पन्नाशीतील मित्र - मैत्रिणी लहानपणीच्या आठवणीत रममाण झाले. अशाप्रकारे अतिशय सुंदर आनंदमय वातावरणात सन १९९१ च्या बॅचचा स्नेहमेळावा पार पडला. त्यामुळे खऱ्या अर्थाने जागतिक मैत्रीदिनाचे सार्थक झाले अशा प्रकारच्या भावना या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

# बाजारात शालेय उपयोगी वस्तू दाखल; खरेदीला विद्यार्थी व पालकांची गर्दी

**तळा :** तळा बाजारपेठेत शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी वस्तू दाखल झाल्या असून विद्यार्थी व त्यांच्या पालकांची वस्तू खरेदी साठी रेलचेल सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहे.

सर्व शाळा सोमवार १६ जूनला सुरू होणार असल्याने बाजारपेठेत वह्या,दप्तर,टिफीन,रेणकोट,छत्र्या चप्पल,बुट,कमरपट्टे व इतर साहित्य दुकांदारांनी विक्रीस आणले आहे यावर्षी मागील वर्षापेक्षा किंमती वाढल्याचे दिसत आहे.तरीही ग्राहक विद्यार्थी व पालकांची बाजारात वस्तू खरेदीसाठी गर्दी असल्याचे पहावयास मिळत आहे. वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य दुकानातून विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे.नागरिकही पावसाळ्यापूर्वी छत्र्या,मेनकापड,रेनकोट,इत्यादी साहित्य अवकाळी पाऊस सुरू झाल्यापासून खरेदी करताना दिसत आहेत.

**शालोपयोगी विद्यार्थ्यांच्या वस्तू महागल्या**




# २०२६ वर्षाच्या सुरुवातीलाच भारत लढणार किवी संघाशी

## रोहित-विराटचा दिसणार जलवा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या संघाने मागील २ वर्षात दमदार कामगिरी केली आहे, टीम इंडियाने टी२० विश्वचषक २०२४ मध्ये जिंकला होता तर २०२५ मध्ये झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीचे जेतेपद देखील जिंकले. भारताच्या संघाला २०२३ मध्ये घरच्या मैदानावर एकदिवसीय विश्वचषकमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. आता २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीला सर्व संघ लागणार आहेत.

टीम इंडिया २०२६ वर्षाची सुरुवात धमाल खेळाने करणार आहे. भारतीय संघ न्यूझीलंडचे त्यांच्याच घरात यजमानपद भूषवणार आहे




अशी माहिती समोर आली आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृतीची घोषणा केली आहे. या मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्मा देखील खेळताना दिसतील. वृत्तानुसार, या मालिकेत एकूण तीन एकदिवसीय सामने आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले जातील.

टाईम्स ऑफ इंडियाच्या बातमीनुसार, जानेवारीमध्ये किवी संघ टीम इंडियाशी तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सामना करेल. ही मालिका ११ जानेवारीपासून सुरु होईल आणि शेवटचा सामना ३० जानेवारी रोजी खेळला जाईल असे मानले जाते. विराट कोहली आणि रोहित शर्मादेखील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत खेळताना दिसतील. कोहली-रोहितने टी-२० आणि कसोटीतून निवृत्ती जाहीर केली आहे आणि आता ते फक्त एकदिवसीय स्वरूपात खेळताना दिसतील.

# शूटिंग चॅम्पियनशिपसाठी खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२८वी कॅप्टन एसजे एझेकिएल (एनआर) कॉम्पिटिशन ६ जून ते ९ जूनदरम्यान महाराष्ट्र रायफल संघटना वरळी, मुंबई येथे झाली. या स्पर्धेत सिद्धांत रायफल आणि पिस्टल शूटिंग क्लब रायगडच्या ३१ नेमबाजांनी प्रतिनिधित्व केले. पदकप्राप्त खेळाडूंची डेहराडून (उत्तराखंड) येथे होणाऱ्या इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.




एनआर कॉम्पिटिशनमध्ये वेदांत किसन खारके, गौरव ठाकूर, कुणाल पाटील, दिग्विजय चौगुले, पार्थ तोडकर, वैभवी बिष्ट, कार्तिकी देऊळेकर, वरा देऊळेकर, नंदकुमार माने, राजू मुंबईकर, शुभम पुसलकर, दुर्गा जाधव, करण बेहेरे, मयुरेश सावंत, सागर वैगनकर, अवनी कोळी यांनी निरनिराळी पदके पटकावली.

या वेळी गौरव ठाकूर व कुणाल पाटील यांना महाराष्ट्र रायफल संघटनेच्या सेक्रेटरी शिला कानूगो व अध्यक्ष अशोक पंडित यांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले.

क्लबचे सेक्रेटरी व राष्ट्रीय नेमबाज किसन खारके, प्रशिक्षक अलंकार कोळी, राल्स्टन कोयलो, क्लबचे सदस्य अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर, अविनाश भगत, प्रकाश दिसले, सुनील मढवी, समीर अंबवणे, नंदकुमार मुंबईकर तसेच मित्र परिवार यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# टेनिसच्या इतिहासात कार्लोस अल्काराजचे नाव अजरामर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रोलां गर्रोच्या मातीवर पुन्हा एकदा स्पेनचा झेंडा फडकला आहे. केवळ २२ वर्षांचा कार्लोस अल्काराजने टेनिसच्या इतिहासात आपलं नाव अजरामर केलं आहे. फ्रेंच ओपन २०२५ च्या जबरदस्त अंतिम सामन्यात अल्काराजने सध्याचा जागतिक क्रमवारीतील नंबर-१ खेळाडू जॅनिक सिनरचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा ही प्रतिष्ठेची ट्रॉफी जिंकली. तब्बल पाच तास २९ मिनिटे चाललेला हा सामना फ्रेंच ओपनच्या इतिहासातील सर्वाधिक लांबलेला फायनल ठरला.

सामन्याची सुरुवात सिनरसाठी दमदार ठरली. पहिल्या सेटमध्ये त्याने ६-४ ने बाजी मारली. दुसऱ्या सेटमध्ये दोघांमध्ये खूप फेस टू फेस स्पर्धा बघायला मिळाला. हा सेट टायब्रेकरपर्यंत गेला आणि तिथेही सिनरने ७-४ ने वर्चस्व राखत दुसरा सेट आपल्या नावावर केला. सगळी गुणसंख्या बघून अनेकांना वाटलं की अल्काराजचा दुसरा सलग फ्रेंच ओपन खिताब अपूर्ण राहणार. पण तसे घडले नाही.

दोन सेट गमावल्यावर अल्काराजने दमदार पुनरागमन करत तिसरा सेट ६-४ ने जिंकला. चौथ्या सेटमध्ये एकवेळ तो पराभवाच्या टोकावर उभा होता, पण त्याने तीन मॅच पॉइंट वाचवत टायब्रेकरमध्ये ७-६ ने बाजी मारली आणि सामना निर्णायक सेटमध्ये गेला. पाचवा सेट अत्यंत चुरशीचा ठरला. दोघांनीही प्रत्येक पॉइंटसाठी खूप विचारपूर्वक खेळ केला. हा सेट सुपर टायब्रेकरपर्यंत गेला. अल्काराजने १०-२ असा सामना आपल्या नावावर केला. शेवटी त्याने ४-६, ६-७ (४-७), ६-४, ७-६ (७-३), ७-६ (१०-२) अशा पद्धतीने फ्रेंच ओपन २०२५ ची विजेतेपद पटकावलं.

ही लढत फ्रेंच ओपनच्या इतिहासातील सर्वात लांब चाललेली फायनल ठरली. संपूर्ण सामना ५ तास २९ मिनिटं चालला, ज्याने याआधीचे सर्व विक्रम मोडीत काढले.

# गिल-गंभीर पर्वाची इंग्लंडमध्ये 'कसोटी'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी सज्ज झाला असून शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली एका नव्या पर्वाला सुरुवात करत आहे. ऋषभ पंत उपकर्णधाराच्या भूमिकेत असेल. २० जूनपासून टीम इंडिया जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या (डब्ल्यूटीसी) नव्या चक्राची सुरुवात करेल.

ही मालिका भारतीय क्रिकेटमधील एका स्थित्यंतराची नांदी मानली जात आहे, कारण रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन या त्रिकुटांच्या कसोटी निवृत्तीनंतरची ही पहिलीच मालिका आहे. धक्कादायक बाब म्हणजे, अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीलाही निवड समितीने संघात स्थान दिलेले नाही. त्यामुळे जसप्रीत बुमराहवर वेगवान गोलंदाजीच्या आक्रमणाचे संपूर्ण नेतृत्व असणार आहे. त्याला मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग आणि प्रसिद्ध कृष्णा यांच्याकडून भक्कम साथीची गरज असेल.

शुबमन गिल या नव्या जबाबदारीसाठी सज्ज असला तरी त्याच्यासमोर आव्हान मोठे आहे. गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय कसोटी संघ स्थित्यंतरातून जात असून आता त्यांना निकाल देण्याची वेळ आली आहे. इंग्लंडच्या धर्तीवर भारताने अखेरची कसोटी मालिका २००७मध्ये राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली जिंकली होती. त्या वेळी तीन सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाने १-० असा विजय मिळवला होता. त्यानंतर भारतीय संघाने चार वेळा इंग्लंडचा दौरा केला, पण त्यांना विजयाची चव चाखता आली नाही.

## आदित्य चषक युवा राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# मुंबई उपनगरकडून पूर्व व पश्चिम विभागाचे संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई उपनगर कबड्डी असो.ने पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज बंदिस्त क्रीडा संकुल येथे होणाऱ्या पहिल्या आदित्य चषक युवा राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता आपले पूर्व व पश्चिम मुले व मुली यांचे चारही संघ जाहीर केले. शिवशक्ती महिला मंडळाने १४ ते १८ जून या कालावधीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्धव म्हानुर, सेरेना म्हसकर यांच्याकडे पूर्व, तर पवन पांडे, भार्गवी म्हात्रे यांच्याकडे पश्र्चिम विभागाचे नेतृत्व सोपवले. मुंबई उपनगरचे सचिव राजेश पडेलकर यांनी संघ प्रसार माध्यमांकरिता जाहीर केला. तो खालील प्रमाणे.

**पूर्व विभाग मुले :-** उद्धव म्हानुर संघनायक, साई खोपकर, पूर्वेश मेस्त्री, आर्यन भोजने, अमित पिसाळ, रिझवान शेख, नारायण परब, यश मोरे, विवेक पोखरकर, ओमकार पाटील, अनिकेत धारा, ओमकार सोनवणे, चिंतन मोरे, लवकुश यादव. प्रशिक्षकः- हेमंत तोडणकर, व्यवस्थापकः- संदेश शिंदे. **पूर्व विभाग मुली:-** सेरेना म्हसकर - संघनायक, मुद्रा पाटील, तनुश्री शिंदे, श्वेता शिद्रुक, किरण शिद्रुक, अस्था सिंग, श्रद्धा कांबळे, आर्या देवरकर, प्रांजल जाधव, रिया टकले, प्राजक्ता राजीवडे, सारा येवले, शर्वरी लांबे, भक्ती केंद्रे. प्रशिक्षकः- श्रीकांत पिंजारी, व्यवस्थापकः- रमेश जावळे. **पश्चिम विभाग मुले:** पवन पांडे - कर्णधार, सुरज यादव, समाधान कासार, सनी यादव, तेजस लांबर, निहार जाधव, शिवा बिर्जे, गणेश उकर्डे, कृष्णा कनोजिया, विजयनाथ पाल, वेदांत भुवड, हर्षद शिर्के, मयुर वानखेडे, आयुष पारदुरे. प्रशिक्षक:- कमलेश पालव, व्यवस्थापक:- सतीश शेट्टी. **पश्चिम विभाग मुली:-** भार्गवी म्हात्रे -संघनायिका, पूजा चिंदरकर, शलाका मर्ढेकर, तन्वी बरागडे, संस्कृती पाटील, मनस्वी पठारे, ऐश्वर्या बोरा, प्रज्ञा लाड, नियती सावंत, कुमकुम सिंग, रीना थोपटे, साक्षी गावडे, प्रिया कोळी, झाशी वाघमोडे. प्रशिक्षकः- अमित ताम्हाणेकर, व्यवस्थापकः- योगेश रेवाळे.

# कागिसो रबाडाने जसप्रीत बुमराहचा मोडला विश्वविक्रम

## कसोटीत रचला नवा विक्रम

**लंडन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये जागतिक कसोटी चॅम्पियनशिप फायनलच्या सामन्याला सुरुवात झाली आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकले होते आणि गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णय दक्षिण आफ्रिकेच्या संघाला फायदेशीर ठरला त्याचे कारण म्हणजेच दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांची कमालीची कामगिरी. आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५च्या फायनल सामन्याच्या पहिल्या इंनिगमध्ये दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने धुव्वादार कामगिरी केली.

११ जून रोजी लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियमवर ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्याने पाच विकेट्स नावावर घेतले, त्यानंतर सोशल मिडीयावर त्याची मोठ्या प्रमाणात व्हा व्हा झाली.



यादरम्यान कागिसो रबाडाने भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा विश्वविक्रम मोडला. रबाडा आता कसोटी क्रिकेटमध्ये सर्वोत्तम स्ट्राइक रेट असलेला गोलंदाज बनला आहे, ज्याने रेड बॉल क्रिकेटमध्ये २०० किंवा त्याहून अधिक विकेट्स घेतल्या आहेत.

आतापर्यंत जसप्रीत बुमराह कसोटी क्रिकेटमध्ये किमान २०० विकेट्स घेऊन सर्वोत्तम स्ट्राईक रेट असलेला गोलंदाज होता, परंतु रबाडाने बुमराहकडून हा विश्वविक्रम हिसकावून घेतला आहे. तथापि, जेव्हा बुमराहला कसोटीत गोलंदाजी करण्याची संधी मिळते तेव्हा तो पुन्हा हा विक्रम आपल्या नावावर करू शकतो. सध्या कसोटी क्रिकेटमध्ये जर कोणत्याही गोलंदाजाचा सर्वोत्तम स्ट्राईक रेट असेल तर तो कागिसो रबाडा आहे. त्याचा स्ट्राईक रेट ३९.१ आहे, तर जसप्रीत बुमराहचा स्ट्राईक रेट ४२ आहे. डेल स्टेन ४२.३ सह तिसऱ्या, वकार युनूस ४३.४ सह चौथ्या, पॅट कमिन्स ४६.३ सह पाचव्या आणि माल्कम मार्शल ४६.७सह सहाव्या स्थानावर आहेत.

सामन्याबद्दल सांगायचे झाले तर ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी २१२ धावांवर गुंडाळले. यामध्ये गोलंदाजांनी कमालिचा खेळ दाखवला होता. त्यानंतर सध्या दक्षिण आफ्रिकेचा संघ फलंदाजी करत आहे, यामध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पहिल्या दिनाच्या समाप्तीवर ४ विकेट्स गमावले आहेत. यामध्ये २२ ओव्हरमध्ये ४३ धावा केल्या आहेत. दुसऱ्या दिनाच्या सुरुवातीला टेम्बा बवुमा आणि डेव्हिड बेडिंगहॅम हे फलंदाजी करत आहेत.




# 'लॉर्ड्स'वर स्मिथचा ऐतिहासिक पराक्रम!

**लंडन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथने लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर नवा इतिहास रचला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२५च्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या डावात ६६ धावांची संयमी खेळी करत स्मिथने लॉर्ड्सवर सर्वाधिक धावा करणारा परदेशी फलंदाज हा मान पटकावला आहे.

स्मिथने लॉर्ड्सवर ५९१ धावा पूर्ण करत ऑस्ट्रेलियाच्या वॉरेन बार्डस्ले यांचा ९९ वर्ष जुना विक्रम मोडला. बार्डस्ले यांनी १९०९ ते १९२६ दरम्यान ५७५ धावा केल्या होत्या. स्मिथने लॉर्ड्सवर आतापर्यंत दोन शतके आणि तीन अर्धशतके झळकावली आहेत. या यादीत आता स्मिथ (५९१), बार्डस्ले (५७५), गॅरी सोबर्स (५७१), डॉन ब्रॅडमन (५५१), शिवनारायण चंद्रपॉल (५१२), दिलीप वेंगसरकर (५०८) आणि एलन बॉर्डर (५०३) अशी नावे आहेत.

स्टीव्ह स्मिथने लॉर्ड्सवर ६६ धावांची खेळी करताना केवळ ऑस्ट्रेलियाच नव्हे, तर जागतिक क्रिकेटमध्येही आपली छाप सोडली आहे. त्याच्या या कामगिरीमुळे लॉर्ड्सवरील विदेशी फलंदाजांचा विक्रम आणि इंग्लंडमधील ५०+ स्कोअरचा विक्रम दोन्ही त्याच्या नावावर झाले आहेत. क्रिकेटप्रेमींमध्ये स्मिथच्या या ऐतिहासिक कामगिरीचे जोरदार कौतुक होत आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com